# वार्षिक अहवाल
# २०१९-२०२०

Sumantra









## सुमंत्र सायकॉलॉजिकल कॉउन्सेलिंग सेंटर, कोथरूड, पुणे.

स्थापना : २०१४
रजि.क्र. F/45073/PUNE
& महा.1991/2014 / पुणे

**प्रिय वाचक,** **२० नोव्हेंबर २०२०**

मी सुमंत्र संस्थेचा ५ वा वार्षिक अहवाल सादर करत आहे. संस्था नोंदणीकृत करण्या आधी पासून प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांच्या समस्या आमच्या निदर्शनास येत होत्या. सर्व शिक्षा अभियान सरकारतर्फे जाहीर झाल्यावर मुले शाळेत जाताना तर दिसतात परंतु त्यांच्यात अपेक्षित प्रगती दिसत नाही. वाचन, लेखन, आकलनाच्या अडचणी मुलांमध्ये आहेत असे निदर्शनास आले. बुद्ध्यांक सामान्य (average)असून देखील अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलांवर काम करावे असे २००५ मध्ये ठरविले. विशिष्ट शारीरिक, मानसिक गरजा असलेल्या मुलांच्या विशेष शाळा असतात. यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले जाते. परंतु सामान्य बुद्धिमत्ता असून देखील अभ्यासात अप्रगत मुलांचे प्रश्न अजूनही पालकांना व शिक्षकांना कळले आहेत असे वाटत नाही.

मुलांच्या समस्या ओळखता न आल्याने मुलांना शिक्षा होते. मार बसतो, घरी आणि शाळेत ओरड बसतो, शाळेत मित्र चिडवतात अशी मुलांची ओढाताण सुरु असते. मानसिक व भावनिक पातळीवर ती दुखावली जातात. सुमंत्र सेंटर वर सर्व स्तरातील पालक ही समस्या घेऊन येतात. पालकांची सुरुवातीला स्वीकारायची मनस्थिती नसते. परंतु त्यांच्या मुलांना उपचारात्मक पद्धतीने शिकविल्यावर जेव्हा फरक दिसायला लागतो तेव्हा त्यांचा दृष्टिकोन बदलतो. अशा निवडक केस स्टडीज आम्ही अहवालात दिल्या आहेत.

असे प्रबोधनाचे काम सुमंत्र ला सातत्याने करावे लागणार आहे. त्याकरिता संस्थेने "**अक्षर मैत्री"** प्रकल्प हाती घेतला आहे . <u>अध्ययन सक्षमतेकडे वाटचाल हे अक्षर मैत्रीचं ब्रीद वाक्य आहे.</u> वस्ती पातळीवरील मुलांना ही मदत मिळावी असा सुमंत्र चा मुख्य उद्देश आहे. पालकांचा, शिक्षकांचा मुलांच्या समस्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला तर मुलांचं 'बालपण' अभ्यासाचे ओझं, ताण, शिक्षा याने न भरता ते आनंदी व्हायला मदत होईल. असा आम्हाला विश्वास वाटतो. बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून पालकांना **आहार विषयक** प्रबोधनाचे काम सुमंत्र संस्थे तर्फे केले जाते. शालेय अभ्यासाच्या प्रगतीत मेंदूच्या सुपोषणाचे कार्य खूप महत्वाचे आहे हे संशोधनाद्वारे सिद्ध झाले आहे.

सुमंत्र संस्थेचा दुसरा महत्वाचा प्रकल्प आहे "**मन दर्पण"** . या प्रकल्पांतर्गत मानसिक स्वास्थ्य सुदृढ करण्या संदर्भात निरनिराळ्या वयोगटासाठी कार्यक्रम घेतले जातात. आमच्या विविध उपक्रमांतर्गत घेतलेल्या निरनिराळ्या कार्यक्रमांचा आढावा या वर्षीच्या अहवालात घेण्यात आला आहे. त्यावरून आपल्याला संस्थेचे काम किती पातळ्यांवर आणि कसे कसे झाले याची थोडी कल्पना येईल. अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे याची आम्हाला कल्पना आहे.

हे शिवधनुष्य पेलण्यासाठी सुमंत्र संस्थेला निरपेक्ष मदत करणारे देणगीदार, प्रकल्प स्वयंसेवक, सल्लागार लाभले त्यांची मी अत्यंत ऋणी आहे. आम्हाला वेळोवेळी मोलाचे सहकार्य करणाऱ्या '**सेवा सहयोग** या संस्थेबद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त करते. एम आय टी शाळेच्या श्रीमती. नीलम ताई वाघ, एम व्ही एम परांजपे प्राथमिक विद्यामंदिर च्या सुषमा ताई भोसले, ज्ञानदा शाळेच्या श्रीमती. वृषाली ताई धोंगडे, सम्राट अशोक शाळेच्या सुनंदा ताई जाधव या सर्व मुख्याध्यापिकांचे आणि वस्ती प्रकल्प चालविण्यास सहकार्य देणारे श्री. भाऊ सुतार या सर्वांनी अक्षर मैत्री

प्रकल्पात सक्रिय सहभाग घेऊन आम्हाला पूर्ण सहकार्य  दिले त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानते. पुणे लोकसत्ता संपादक श्री. श्रीराम ओक यांनी आमच्या सर्व कार्यक्रमांना योग्य ती प्रसिद्धी दिली याबद्दल मी कृतज्ञ आहे. “लेख परीक्षण “ हे संस्थेचे अत्यावश्यक काम, आमच्या ऑडिटर श्रीमती. वेदवती लेले यांनी व्यवस्थित केले. त्यांचे मी आभार मानते.    मी पाहिलेल्या स्वप्नांच्या पंखांना उंच भरारी घेण्याचे बळ दिले माझ्या सहकारी विश्वस्तांनी. त्यांची अशीच साथ मिळत राहो अशी सदिच्छा व्यक्त करते.



विनया भोसेकर
अध्यक्ष,

**Sumantra Psychological Counseling Center**
**Kothrud, Pune 411038.**

# अहवाल

सुमंत्र सायकॉलॉजीकल  कौंसेलिंग सेंटर ही सेवाभावी, नोंदणी कृत संस्था आहे. संस्थेची अनौपचारिक स्थापना १४ नोव्हेंबर २००५ या वर्षी झाली आणि ९ वर्षे भरपूर काम केल्यानंतर, २८ नोव्हेंबर २०१४ रोजी औपचारिक स्थापना करण्यात आली . तेव्हापासून संस्था मानसिक आरोग्य व मुलांच्या शैक्षणिक समस्यांवर काम करत  आहे. सुमंत्र संस्थेच्या संचालिका विनया भोसेकर यांना काही वर्षे महापालिकेच्या शाळांमधून काम करत असतांना अभ्यासांत अनेक अप्रगत मुले आढळली आणि त्याच बरोबर या मुलांमध्ये  बऱ्याच प्रमाणात वर्तनाच्या  समस्या पण निदर्शनास आल्या . मुले नुसतीच पुढील वर्गात ढकलली जात होती , इयत्ता ४ थी व ५ वी च्या विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित प्रगती दिसत नव्हती . मुलांना नुसता ओरडा बसायचा आणि बरेच वेळा मार पण खावा लागायचा. हे दृश्य वारंवार पाहिल्यावर खूप यातना होत असत . याच्यावर अधिक काम करायला हवे अशी याची जाणीव होऊ लागली . अधिक खोलात जाऊन समस्या समजून घेऊन, उपाय करायला हवेत, हे जाणवले आणि मुलांमधील अध्ययन अक्षमते वर काम करण्याची प्रेरणा मिळाली . हे काम वस्ती पातळीवर करायचे हाही दृढ निश्चय केला, कारण वस्तीतील मुलांना सहजपणे  उपचारात्मक मदत मिळत नाही. त्यांच्या पर्यंत पोहोचण्यासाठी काही समविचारी मंडळी एकत्र आली आणि अध्ययन अक्षमतेवर काम करण्याची संकल्पना जन्मास  आली .

'साकव ' हे नाव धारण करून कामाची  सुरुवात झाली . जिथे जिथे अनावश्यक अंतर असेल, ते साकव बांधून, म्हणजे पूल बांधून त्यावर मात करायची ही त्यामागील भावना . काही तांत्रिक अडचणींमुळे हे नाव रजिस्टर करता नाही आले.  २०१४ मध्ये  सुमंत्र  सायकॉलॉजीकल कौन्सेलिंग सेंटर असे नामकरण केले गेले. सुमंत्र म्हणजे चांगला सल्ला किंवा मार्गदर्शन, हे ही नाव समर्पक वाटले व रीतसर काम सुरु केले .

दृष्टी : "शालेय अभ्यासात येणाऱ्या अडचणींवर मात करून मुलांचे शिकणे आनंददायी व्हावे आणि सर्वांचे मानसिक  स्वास्थ्य सबलीकरण करावे"

मिशन : "अध्ययन अक्षमतेबद्दल असलेले अज्ञान निर्मूलन आणि मानसिक आरोग्य अज्ञान निर्मूलन करून जाणीव जागृती  कार्यक्रम सर्वदूर पोहचविणे"

स्थापनेच्या वर्षापासून संस्था ५ निरनिराळ्या प्रकल्प /उपक्रमांवर काम करत आहे .

**अक्षर मैत्री प्रकल्प :**

शालेय अभ्यासात मागे पडण्याची अनेकविध कारणे असू  शकतात . त्यापैकी अध्ययन अक्षमता हे  एक कारण असू असते . ह्या अध्ययन अक्षमते मागे दडलेली वैद्यकीय किंवा मनो-वैद्यकीय  कारणे कुशलपणे शोधून काढणे आणि त्यावर उपचारात्मक अध्यापन करणे असे  आमच्या समुपदेशन केंद्राचे मुख्य काम आहे. असे  करताना आम्ही पाल्य ,त्याचे आई वडील व त्याचे शिक्षक यांच्यामध्ये महत्वाचा दुवा म्हणून काम करतो . यामुळे शाळा गळती, वर्तन समस्या ह्या गोष्टी कमी होण्यास हातभार लागतो.  वस्ती तील मुलांना वस्तीत उपचारात्मक अध्यापनाची मदत मिळावी याचाही संस्था प्रयत्न करते व वस्तीत वर्ग चालवते व शाळेत उपचारात्मक वर्ग घेतले जातात, मुलांना उपचारात्मक अध्यापनाची मदत मिळावी यासाठी संस्था उपचारात्मक अध्यापनाचा शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करते .

**सृजन आनंद** : ह्या उपक्रमांतर्गत अध्ययन अक्षम मुलांना शिकवण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करण्यात येते . ज्यामुळे मुलांना विविध प्रकारच्या गणिती किंवा भाषिक संकल्पना सोप्या पद्धतीने स्पष्ट व्हायला मदत होते.

**मानस :**

ह्या उपक्रमांतर्गत विद्यर्थ्यांच्या भावनिक आणि वर्तन समस्यांविषयी समुपदेशन केले जाते. विविध मानसिक चाचण्या उदा . बुद्ध्यांक , व्यक्तिमत्व , अभिक्षमता (aptitude) अशा चाचण्या घेतल्या जातात. प्ले थेरपी ,आर्ट थेरपी व म्युझिक थेरपी पण घेण्यात येते.

**साकव :**

ह्या कार्यक्रमांतर्गत विवाह पूर्व ,वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशनही केले जाते . ह्या तिन्ही अवस्थांमध्ये मनामनातील मतभिन्नता , व्यक्तिमत्वाचे विशिष्ट पैलू समज-गैरसमज आणि निरनिराळे मानबिंदू यामधील विचित्र गुंता प्रोफेशनल समुपदेशन पद्धतीने सोडवण्यासाठी प्रयत्न केला जातो आणि सुसंवादाचा साकव बांधला जातो.

**आविष्कार :**

ह्या उपक्रमांतर्गत सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी निरनिराळी शिबीरेही आयोजित केली जातात. ह्या मधे अभ्यास कौशल्ये , व्यक्तिमत्व विकास व कुमारवयीन समस्या अशा विविध गोष्टींवर भर दिला जातो .

## २०१९ एप्रिल ते २०२० मार्च च्या दरम्यान संस्थेने ठरवलेले/घेतलेले महत्वाचे उपक्रम .

अक्षर मैत्री, मन दर्पण , सृजन साहित्य ,मानस , आविष्कार.

### अक्षर मैत्री :

एप्रिल २०१९ ची सुरवात उपचारात्मक अध्यापन प्रशिक्षण आयोजित करून झाली. हे प्रशिक्षण एकूण ४ दिवस घेण्यात आले. सुमंत्र संस्थेच्या स्वयंसेवकांसाठी विनामुल्य घेण्यात आले. वैशाली बढे यांनी प्रशिक्षणाची मुख्य जवाबदारी घेतली. इतर विषय : ब्रेन जिम (मेंदूचे व्यायाम) - जान्हवी कुळकर्णी , म्युझिक थेरपी- वृषाली बिवरे यांनी घेतली. व शैक्षणिक साधने तयार करण्यास शिकवण्याचे काम शैलजा जोशी यांनी केले . ११ स्वयंसेविकांनी प्रशिक्षण घेतले .सुमंत्र संस्थेच्या सभासद दीपाली नेमाडे यांनी प्रशिक्षणार्थींना उन्हाळा असल्यामुळे ताक व पन्ह्याची सोय केली .



जानेवारी २०१९ मध्ये संस्थेच्या स्वयंसेविका डॉ . मनीषा कावतकर यांनी सुमंत्र संस्थेच्या कार्याची ओळख करून देण्याकरिता १८ मिनिटांची डॉक्युमेंटरी फिल्म चित्रीकरणाची सुरुवात केली . याच्या चित्रिकारणाकरिता त्यांना मिमो फिल्म्स चे निर्माते श्री . मिलिंद देव व अथर्व देव यांचे मौलिक सहकार्य मिळाले . त्यांनी ही फिल्म विनामूल्य करून दिली . या फिल्म चे औपचारिक उद्घाटन करण्याचे सर्वानुमते ठरले . हा उदघाटन समारंभ ५ जून २०१९ रोजी पत्रकार भवन येथील प्रेक्षागृहात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी  मा .शुभांगी ताई  चव्हाण , उप-प्रशासकीय अधिकारी ,शिक्षण विभाग पुणे म.न.पा. या होत्या . तर मिमो क्रिएशन्स चे मा . श्री . मिलिंद देव प्रमुख पाहुणे होते . यावेळी माहितीपटाच्या दिग्दर्शिका डॉ . मनीषा कावतकर , सिनेमॅटोग्राफर श्री . अथर्व देव उपस्थित होते .



प्रास्ताविकात सुमंत्र संस्थेची माहिती, संस्थेच्या कोषाध्यक्ष, वैशाली बढे यांनी दिली. सुमंत्र संस्था गेली अनेक वर्षे अध्ययन अक्षमतेवर काम करत आहे . विशेषतः कोथरूड मधील वस्त्या,  सुतारदार , किष्किंधा नगर , जय भवानी नगर  येथे काम करत आहे . संस्थेच्या उपाध्यक्ष विभावरी बिडवे यांनी माहितीपटाचा हेतू उलगडून सांगितला. संस्थेच्या विश्वस्त वृषाली बिवरे यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली .

सुमंत्र संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मा. विनया भोसेकर या गेली ४४ वर्षे समाजसेवा  आणि ३१ वर्षे समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असून त्यांना प्रकर्षाने ही समस्या जाणवत होती व गेल्या काही वर्षात त्यात वाढ झाल्याचेही जाणवले. त्यामुळे या विषयावर काम करावयास सुरुवात केली. या विषयावर लोकांमध्ये जागृती व्हावी म्हणून  त्यांनी अपर्णा धर्माधिकारी यांच्या समवेत **‘अक्षर मैत्री ‘ ही पुस्तिका  काढली.** कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. शुभंगीताई चव्हाण,यांनी अध्ययन अक्षमतेच्या वाढलेल्या प्रमाणाबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच सुमंत्र या क्षेत्रात करत असलेल्या कामाबद्दल गौरवोद्गार काढले . सुमंत्र ने प्रकाशित केलेली ‘अक्षर मैत्री’ पुस्तिका अध्ययन अक्षमतेबद्दल माहिती देणारी परिपूर्ण पुस्तिका आहे असेही आवर्जून सांगितले.



**माननीय. शुभांगी ताई चव्हाण, श्री. मिलिंद देव यांच्या समवेत सुमंत्र ट्रस्टीज**

संस्थे चे देणगीदार , इतर संस्थांचे संचालक , स्वयंसेविका , अनेक हितचिंतक यांच्या उपस्थितीत हा सोहळा सुंदररीत्या पार पडला . अक्षर नंदन शाळेच्या संचालिका विद्याताई पटवर्धन , वरिष्ठ शिक्षिका लाराताई पटवर्धन, स्त्री मुक्ती संघटनेच्या वरिष्ठ कार्यकर्त्या मुक्ता शिंगटे, कौन्सेलर सुप्रिया बेंडखळे, प्रेरणा कौन्सेलिंग सेंटर च्या अनुपमा जोशीराव, प्रकल्प देणगीदार श्री . एल.आर.गणेशन, सुमंत्र सल्लागार श्री . मनीष पुराणिक , सुमंत्र मेंटर श्री.बालसुब्रमनियम, वरिष्ठ सक्रिय कार्यकर्ते श्री.अविनाश भोसेकर, सुप्रसिद्ध गायिका अपर्णा केळकर, गंगोत्री बिल्डर्स संचालक श्री. मकरंद केळकर असे मान्यवर उपस्थित होते . कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन संस्थेच्या मानसतज्ञ यशश्री हुद्दार यांनी केले. याच कार्यक्रमात सुमंत्र संस्थेची बारामती रेमेडियल सेंटर ची घोषणा करण्यात आली. सुमंत्र संस्थेच्या सर्व स्वयंसेविकांना आदराने व्यासपीठावर बोलवून त्यांची ओळख करून देण्यात आली.प्रेक्षकांनी भरपूर टाळ्या वाजवून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला .



**सुमंत्र संस्थेच्या सर्व स्वयंसेविका**



**अक्षर मैत्री माहितीपट उद्घाटनाप्रसंगी आलेले प्रेक्षक**

**या कार्यक्रमानंतर प्रेक्षकांच्या  काही निवडक प्रतिक्रिया नमूद करत आहोत .**

**श्रुती यज्ञोपवीत :**

**“सुमंत्र च्या आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेणारा आखीव रेखीव कार्यक्रम उत्तमरित्या सादर झाला . संस्थेच्या उपक्रमांची ओळख , प्रमुख पाहुण्यांचे, अध्यक्षांचे भाषण सगळंच अगदी सुंदर झालं आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ती फिल्म, ज्यामुळे सुमंत्र ची आतापर्यंतची वाटचाल लोकांपर्यंत व्यवस्थित पोहोचली . संस्थेच्या संचालिका विनया  मॅडम च्या मनोगतातून त्यांची तळमळ दिसत होतीच . आभार प्रदर्शन आणि स्वयं सेविकांची ओळख मॅडम नी छान पद्धतीने करून दिली” .**

**शिल्पा घाटणेकर :**

**“कार्यक्रम खूपच छान झाला. एकदम well organised. अध्यक्ष आणि चीफ गेस्ट एकदम परफेक्ट, आपल्या विषयाला साजेसे अनुरूप. चव्हाण बाईंचे विचार ऐकून खूप छान वाटले सरकारी नोकरीत अशीही माणसे असतात पाहून आशादायी वाटले. देव सरांचे भाषणही छान झाले. सामाजिक क्षेत्रात भान ठेवून काम करणारी माणसे नुसती पहिली तरी खूप पॉझिटिव्ह वाटते. अशाच लोकांमुळे समाजात चांगिल्पना टिकून राहतो. तुमचे मनोगत तर शिरपेचच होते. तुम्ही अगदी मनापासून संस्था स्थापन केलीत आणि सगळ्यांना हाताशी घेऊन वाढवलीत. याबद्दल कौतुक करावे  तेवढे कमीच. रेमेडियल टीचिंग बद्दल ची तुमची तळमळ मनाला थक्क करणारी आहे. हीच तळमळ तुम्हाला माणसे मिळवून देईल आणि तुमचे कार्य दिवसेंदिवस वृद्धिंगत होत राहील यात शंका नाही. तुमच्या कार्याला माझ्या मनापासून खूप खूप शुभेच्छा”!**



## सुमंत्र संस्थेतर्फे माहितीपटाची निर्मिती

पुणे : कोथरूड येथील सुमंत्र सायकॉलॉजिकल कौन्सेलिंग सेंटरने 'अक्षरमैत्री' नावाचा माहितीपट नुकताच तयार केला. त्याचे उद्घाटन महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या उप-प्रशासकीय अधिकारी शुभांगी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून मिमो क्रिएशनचे मिलिंद देव, महितीपटाच्या दिग्दर्शिका डॉ. कावतकर उपस्थित होत्या. संस्थेच्या कोषाध्यक्ष वैशाली वढे यांनी प्रास्ताविकात संस्थेची माहिती दिली. संस्थेचे उपाध्यक्ष विभावरी बिडवे यांनी महितीपटाचा हेतू उलगडून सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेच्या सायकॉलॉजिस्ट यशश्री हुद्दार यांनी केले.

चव्हाण म्हणाले, 'सुमंत्रने प्रकाशित केलेली अक्षरमैत्री ही पुस्तिका अध्ययन अक्षमतेबद्दल माहिती देणारी परिपूर्ण पुस्तिका आहे.' संस्थेच्या अध्यक्षा विनया भोसेकर म्हणाल्या, 'गेली ३१ वर्षे समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असून, प्रकर्षाने अध्ययन अक्षमतेबाबत समस्या जाणवत होती. त्यामुळेच या विषयावर काम करण्यास सुरुवात केली. या विषयावर लोकांमध्ये जागृती व्हावी म्हणून 'अक्षरमैत्री' ही पुस्तिका काढली.'





ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. अविनाश भोसेकर यांनी  कार्यक्रम संपल्यावर  उत्स्फूर्तपणे कवितेच्या रूपात दाद दिली. ती येथे देत आहोत .

संमेलन हे आज अनोखे ,अनुभवले किती दिसांनी,
वर्णन करण्या शब्द अपुरे , पडले किती दिसांनी !
स्त्री शक्ती ती  दिसली सर्वां , एकवटलेली किती दिसांनी,
नाक खुपसण्या कोणी नव्हता पुरुष किती दिसांनी  !! १ !!

सुमंत्र संस्था आज पाठीशी , उभी मुलांच्या काही,
ज्यांचे मन ते चंचल आणिक अप्रगत असती काही !
मनात ज्यांच्या गोंधळ सगळा, अक्षर निरक्षरांचा,
पाठीवर हो हात तयांच्या,  धीर सुमंत्राचा !! २  !!

टीचर सगळ्या सज्ज जाहल्या , गुंता सोडविण्यास,
उपचारात्मक तंत्र नाजूक , आले उपयो गास !
रटफ चा गोंधळ त्यांचा आला वळणावरती,
अ, आ, इ, ई जमू लागले त्यांना वेळेवरती !! ३ !!

फिल्म एक सुंदरशी ती , बनविली कावतकरांनी,
कडकडून हो टाळ्या पडल्या , सर्वांच्या दोन्ही करांनी !
फिल्म बनविण्या हात लागले , साक्षात हो देवांचे,
फुटा- फुटाला  जाणवले ते,  कौशल्य त्या हातांचे  !! ४ !!

दुवा साधला उत्तमसा तो, सु सूत्रसंचालनाने,
अंतर्मुख केले सर्वां, सगळ्यांच्या भाषणाने !
शुभांगी ताई समाधानल्या , महाकार्य ते बघुनी,
परंतु झाल्या व्यथित काहीशा, महाकाय समस्या बघुनी !! ५ !!

पदर खोचला घट्ट मजबुत , सगळ्या स्वयंसेविकांनी,
आणि उचलला विडा शेवटी, सुमंत्रास त्या स्मरूनी !
पुढे नेऊ, अन तेवत ठेवू, सत्कार्याची ही मशाल,
राहू पाठीशी विनयाताई, राहा निश्चिन्त खुशाल !! ६ !!

अविनाश भोसेकर

सेवाध्यास

श्रीराम ओक
shriram.oak@expressindia.com

# सुमंत्रचा 'अक्षर' मंत्र



**मुले हा शब्द उच्चारताच त्याच्या जोडीने येणारे दोन शब्द म्हणजे 'बुद्ध्यंक' आणि 'भावनांक'. मुलांच्या वाढीच्या आणि अभ्यासाच्या प्रगतीमध्ये नानाविध समस्या येताना आपण अनेकदा पाहतो. बुद्ध्यंक चांगला असूनही अभ्यास समजत नाही, या कारणासह वाचन-लेखन आकलनाबाबतची अडचण असल्याचे दिसते. मग ती मुले कोणत्याही आर्थिक वर्गातील असली, तरी त्यांच्या समस्या दूर करण्याची आवश्यकता असते. वस्तीपातळीवरील मुलामुलींमध्ये या प्रकारची समस्या आढळल्यास त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी या मुलांच्या पालकांमध्ये आर्थिक सक्षमतेचा जसा अभाव असतो, तसेच या मुलांसाठी काय करावे याची सुयोग्य दिशाही काही वेळा त्यांच्याकडे नसते. अशा मुले आणि पालकांसाठी 'सुमंत्र' ही संस्था मागील पाच वर्षांपासून कार्यरत आहे.**

**मुलांचे शाळागळतीचे** प्रमाण या विषयावर अनेकदा चर्चा होतात. या गळतीमागे अभ्यास समजत नाही, हे एक कारण असू शकते. या मुलांना वाचन, लेखन, आकलनाबाबतची अडचण असते. तसेच ही मुले तोंडी उत्तरे व्यवस्थित देऊ शकतात, पण परीक्षेचा पेपर नीट लिहू शकत नाहीत, वाचताना अडखळतात, अक्षर उलट-सुलट करून लिहितात. तर काही मुलांना गणितात अंक ओळखता न येणे, संख्येचे स्थान लक्षात न राहिल्याने अंक उलट-सुलट जागी लिहिणे अथवा वाचणे, भाषिक गणिते न समजणे आदी विविध प्रकारच्या अडचणी येतात. 'अध्ययन अक्षमता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या समस्या सोडवण्यासाठी पालकांनी दिलेले लक्ष तसेच आर्थिक तरतूदही आवश्यक असते. हे झाले आर्थिक सक्षमता असणाऱ्यांसाठी. पण जेथे आर्थिक सक्षमतेचा अभाव आहे, तेथील, म्हणजे वस्तीपातळीवरील मुलांच्या समस्यांचे काय? त्यांची अध्ययन अक्षमतेची समस्या सोडवता यावी यासाठी स्थापना करण्यात आली आहे ती 'सुमंत्र सायकॉलॉजिकल काउन्सिलिंग सेंटर' ची. वस्त्यांमधील मुलांसाठी या समस्येवर उपचारात्मक अध्यापन हा प्रकल्प सुमंत्रतर्फे चालविला जातो.

मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व पालकांना समजलेले नसते तसेच पोटापाण्यासाठी आई-वडील दोघेही दिवसभर कामावर जातात. मुलांकडे लक्ष देण्यासाठी पालकांना जसा वेळ नसतो, तसेच या समस्येबाबतचे पुरेसे आकलन त्यांनाही झालेले नसते. मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यायला मिळणारी सवडही आणि समज यांचाही तेथे अभाव असतो. अशा विविध कारणांमुळे वस्त्यांमधील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. या मुलांनाही शिक्षणाच्या प्रवाहात आणावे म्हणून सुमंत्रच्या अध्यक्षा विनया भोसेकर यांनी समवयस्क मैत्रिणींना सोबत घेऊन या विषयावर काम सुरू केले. याची कार्याची सुरुवात झाली ती अभ्यासवर्गापासून. सुरुवातीला त्यांनी कोथरूडमधील वस्त्यांमधील मुलांसाठी अभ्यास वर्ग सुरू केले. त्याच बरोबर त्यांच्यासाठी संस्कार वर्गही घेतले. या वर्गामध्ये लेखन, वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी सुमंत्र तर्फे 'रेमेडीयल' शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या चाचण्या घेऊन ही मुलं नेमकी कोणत्या बाबतीत मागे आहेत, ते जाणून घेण्यात आले. त्यांना शास्त्रशुद्ध पद्धतीनं शिकवलं जाऊ लागले. त्यामुळे मुलांच्या अभ्यासात गुणात्मक सुधारणा तर झालीच पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्येही चांगले बदल झाले.

वस्तीतील कामाबरोबरच एका शाळेमध्ये सुमंत्रने अभ्यास वर्ग सुरू केले. वर्ग सुरू करण्यापूर्वी अध्ययन क्षमता तपासण्यासाठी काही चाचण्या घेतल्या. विद्यार्थ्यांच्या समस्येचे योग्य पद्धतीने पृथक्करण करून त्यावर उपाय योजना निवडण्यात आल्या. या शाळेतील मुख्याध्यापिकांशी यावर चर्चा केली गेली. तिथल्या काही शिक्षिकांच्या मदतीने मुलांच्या अभ्यासातील अडचणी समजून घेतल्या गेल्या. भाषा आणि गणित विषयांच्या काही चाचण्या घेऊन विद्यार्थ्यांना अभ्यासात नेमक्या कोणत्या अडचणी येतात, हे मानसशास्त्रज्ञांच्या मदतीने समजून घेण्यात आले. कुणाला मुळाक्षरांचे लेखन जमत नव्हते तर कुणाला जोडाक्षरे लिहिता येत नव्हती. कुणाला गुणाकार-भागाकाराच्या संकल्पना समजलेल्या नव्हत्या. या चाचण्यांमुळे मुलांना कसं शिकवायचं याची दिशा निश्चित करता आली. सुमंत्रच्या सर्व शिक्षकांना अध्ययन अक्षम मुलांना शिकविण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण देण्यात आलेले असून शाळेतच दुसरी ते चौथीच्या अभ्यासात मागे पडणाऱ्या निवडक मुलांसाठी सोमवार ते शुक्रवार अभ्यास वर्ग सुरू केले आहेत. त्यामुळे वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्यांना शिकवलं जातं.

पाच वर्षांच्या कामानंतर सुमंत्र संस्थेला या कामाची व्याप्ती वाढविण्याची गरज भासू लागली आहे. त्यासाठी त्यांना स्वयंसेवकांची गरज भासू लागली आहे. सुमंत्रने या विषयावरील 'अक्षरमैत्री' हा माहितीपट बनवला आहे. या माहितीपटाचे सादरीकरण नुकतेच करण्यात आले. सुमंत्रच्या अक्षरमैत्री प्रकल्पावरील १८ मिनिटांचा हा माहितीपट डॉ. मनीषा कावतकर यांनी दिग्दर्शित केला आहे. सुमंत्रने अक्षरमैत्री हे पुस्तकही शिक्षक आणि पालकांसाठी प्रकाशित केले आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या समविचारी लोकांची नियमित चर्चा घडायला हवी, उपाय शोधायला हवेत तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे आणि त्यासाठी एकमेकांना स्पर्धक न मानता सहकारी मानून काम करायला हवे असे विनयाताईंना वाटते.

सुमंत्र वस्ती व शाळा पातळीवर उपचारात्मक अध्यापनाचे काम अक्षरमैत्री या प्रकल्पाद्वारे करत आहे. अध्ययन अक्षमते मागे दडलेली वैद्यकीय किंवा मनो-वैद्यकीय कारणे कुशलपणे शोधून काढणे, हे सुमंत्रच्या समुपदेशन केंद्राचे मुख्य काम आहे. हे करताना रेमेडियल टीचर्स पाल्य, त्याचे आई-वडील व त्याचे शिक्षक यांच्यामध्ये महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतात. या प्रयत्नांमुळे या मुलांच्या मनाचे व्यापार योग्य पद्धतीने समजून घेऊन हळुवारपणे हाताळल्यामुळे गुंता सुटत जातो. संस्थेचा दुसरा उपक्रम म्हणजे सृजन आनंद. या उपक्रमांतर्गत अध्ययन अक्षम मुलांना शिकविण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य संस्था तयार करते.

विद्यार्थ्यांच्या भावनिक समस्या, वर्तन समस्यांविषयी समुपदेशन, विविध मानसिक चाचण्या तसेच विविध उपचार पद्धतीही संस्थेमार्फत घेतल्या जातात. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांना जोडणारा आणि त्यांच्यातील वर्तन व अध्ययन समस्यांवर अचूक उपाययोजना करणारा महत्त्वाचा दुवा म्हणून काम करणाऱ्या सुमंत्रच्या विविध उपक्रमांची माहिती घ्यायची झाल्यास ८४०८८४०६१६ या क्रमांकावर संपर्क साधता येईल अथवा www.sumantra.center ही वेबसाइट देखील पाहता येईल.

आपले मूल एक उत्तम व्यक्ती म्हणून समाजात यशस्वीपणे वावरली पाहिजे, असे प्रत्येक आई-वडिलांना वाटत असते. त्याने स्वावलंबी बनून आत्मविश्वासाने समाजात स्वतःचे स्थान निर्माण करावे असेही वाटते. पण योग्य वेळी मुलांमधील अध्ययन अक्षमता लक्षात घेऊन अशा मुलांच्या पालकांनी आणि शिक्षकांनी त्यांना योग्य पद्धतीने मार्गदर्शन केले तर त्यांच्यातील सुप्त गुणांना जागृत करून त्यांना सक्षम बनवणे शक्य होईल.

लोकसत्ता Wed, 19 June 2019
https://epaper.loksatta.com/c/40526128

लोकसत्ता दैनिकाच्या  सेवा ध्यास या सदरात  - **'सुमंत्रचा  अक्षर मंत्र'** हा लेख वाचून, सुमंत्र संस्थेच्या कार्याबद्दल श्रीमती . अनुराधा काळे यांनी एक कविता पाठवली.

**सेवा ध्यास**

माय बाप दिवसभरी राब राबत
लेकरांच्या पोटासाठी चिंतेत
कैसी मिळावी त्यांसी उसंत
पोरांच्या अभ्यास आकलनात

आकलन अक्षमता समस्या जाणत
वस्ती पातळीवर निरीक्षण करीत
"सुमंत्र" अक्षरमंत्र जपत
जाहली कार्यास उद्युक्त

मूळ असे मुलांच्या आकलनक्षमतेत
विविध चाचण्या निरीक्षणे करीत
वर्तन अध्ययन समस्या जाणीत
सुमंत्र असे कार्यरत

भावनिक समस्या जाणत
विद्यार्थी पालक दुवा जोडीत
अनेक उपक्रम राबवित

"अक्षरमैत्री" माहितीपट निर्मिती करीत
"ऐसे पाऊल त्याचे स्वागत"

**अनुराधा काळे**

जून महिनाभर ब्लॉक प्लेसमेंट साठी कोल्हापूरहून २ एम एस डब्ल्यू च्या विद्यार्थिनी धनश्री ढाणे आणि साधना सुमंत्र संस्थेत प्रशिक्षणासाठी आल्या होत्या . त्यांनी संस्थेच्या कामात सक्रिय सहभाग घेतला . त्यांच्या कॉलेज च्या अपेक्षेप्रमाणे त्यांना उत्तम प्रशिक्षण दिले गेले . ऑफिस व्यवस्थापन, मीटिंग चे मिनिट्स लिहिणे , इतर संस्थाशी संपर्क साधणे, कार्यक्रमाची आखणी करून कार्यक्रम पार पाडणे , सर्वेक्षण फॉर्म बनविणे आणि वस्तीत जाऊन सर्वेक्षण पूर्ण करणे . त्यांनी १०० कुटुंबांचा अभ्यास पूर्ण करून सांख्यिकी तक्ता पूर्ण केला . त्यांनी पाहणी केली त्याचे खालील प्रमाणे निष्कर्ष निघाले . सर्वेक्षण केलेल्या १०० विद्यार्थ्यांपैकी ६९ विद्यार्थी शालेय अभ्यासात




अप्रगत आहेत असे आढळले. किष्किंधा नगर व सुतारदरा येथील ४५ मुले सविस्तर चाचण्या देऊन निवडण्यात आली. त्यांच्या करिता रेमेडियल वर्ग सुरु करण्यात आले. त्या साठी वैशाली बढे यांनी एक पालक सभा घेतली.

अध्ययन अक्षम असलेल्या मुलांना शिकविण्याकरिता निरनिराळ्या सृजनशील साहित्याची आवश्यकता असते. श्रीमती . शैलजा जोशी यांच्या ओनामा संस्थेची कल्पक शैक्षणिक खेळणी घेऊन किट तयार करण्याचे ठरले . या किट मध्ये गणिती संज्ञा खेळातून समजण्यासाठी , अक्षर ओळख सुलभतेने व्हावी म्हणून काही activities दिल्या आहेत . त्याचप्रमाणे वाचन व लेखन करणे सोपे जावे म्हणून पुस्तके , रंग काम करणेसाठी रंग वगैरे १० विविध प्रकारचे साहित्य ठेवण्यात आले . सेवा सहयोग व डॉइश बँक च्या आर्थिक सहकार्याने अध्ययन अक्षम मुलांकरिता रेमिडियल किट चे वाटप करण्यात आले. सुमंत्र संस्था वर्ग चालवते त्या शाळा आणि वस्तीतील मुलांचे वर्गातील ८५ विद्यार्थ्यांना ही किट देण्यात आली .या कार्यक्रमाला सेवा सहयोग चे श्री . नितीन पाटसकर , त्यांचे सहकारी व डॉइश बँक पदाधिकारी , सुमंत्र संस्थेच्या उपाध्यक्ष विभावरी बिडवे , संस्थेच्या रेमेडियल केंद्राच्या मुख्य वैशाली बढे, सर्व रेमेडियल शिक्षिका, कार्यकर्त्या डॉ. मनीषा कावतकर, मानस तज्ञ यशश्री हुद्दार उपस्थित होत्या.



**सुमंत्र ट्रस्टीज ,डॉईश बँक अधिकारी आणि मुले**




**सुमंत्र लर्निंग किट मधील साहित्य**



**सुतारदरा वस्तीतील मुलांचा वर्ग व शिक्षिका**



**डॉईश बँके तर्फे रेमेडियल लर्निंग  किट वाटप**

अध्ययन अक्षमतेबद्दल अजूनही समाजात बरेच गैरसमज आहेत . मुलांच्या संपर्कात येणाऱ्या शालेय शिक्षिका , पालक समस्ये बद्दल अस्वीकाराची भूमिका घेत आहेत . ही जाणीव वाढावी या करीत संस्था सतत प्रयत्नशील असते. निर-निराळ्या शाळांना भेट देऊन पालक शिक्षकांच्या सभा घेतल्या जातात . त्यानुसार  बारामती येथे अध्ययन अक्षमता जाणीव जागृती शालेय कार्यक्रम सायरस पुनावाला सी.बी.एस.इ.  शाळेत ३१ ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित केला . सुमंत्र च्या कार्यकर्त्या श्रुती यज्ञोपवीत यांनी पुढाकार घेऊन या सत्राचे  नियोजन केले . शाळेच्या मुख्याध्यापिका सौ . संजीवनी निगडे  आणि सर्व शिक्षिका सत्रास उपस्थित होत्या . सुमंत्र विश्वस्त वैशाली बढे यांनी हे सत्र पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन द्वारे उत्तम रित्या घेतले . विविध उदाहरणे देऊन शिक्षकांना सहभागी करून घेऊन वैशाली ताईंनी सत्र छान घेतले . सुमंत्र च्या मानसतज्ञ यशश्री हुद्दार याही सहभागी होत्या .




**मुख्याध्यापिका संजीवनी निगडे वैशाली बढे यांचा सत्कार करताना**

बारामती येथे इतर दोन शाळांमधून श्रुती यज्ञोपवीत यांनी शिक्षकांसाठी मार्गदर्शन सत्रे घेतली . जनहित विद्यालय येथील शिक्षकांना अध्ययन अक्षमता ही संकल्पना नवीन होती . श्रुती ताईंनी त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली , शंका निरसन केले .मुख्याध्यापक श्री . हनुमंत दुधाळ व शिक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला . महात्मा गांधी बालक मंदिर या शाळेत मुख्याध्यापक श्री . सतीश खंडागळे आणि शिक्षकांनी पहिल्यापासूनच या कार्यशाळेबद्दल खूप छान उत्साह दाखवला . मुलांमध्ये ही अभ्यासाची अडचण येते ,हे लक्षात येत होतं , पण त्यासाठी काय करता येईल हे आता समजले, असे त्यांनी आवर्जून सांगितले




**श्रुती यज्ञोपवीत बारामती शिक्षक सभा**



**बारामती येथील शिक्षिका सभा**

सुश्री फाऊंडेशन या सामाजिक संस्थेमार्फत ‘आरसा समाजमनाचा ‘ या उपक्रमांतर्गत मुलांच्या वाढीमध्ये अडसर ठरणाऱ्या समस्यांवर मार्गदर्शन करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . मुलांच्या प्रगती मध्ये कोणतीही बाधा येऊ नये म्हणून पालक जागरूक असतात . असे असताना मुलांच्या अभ्यासाबाबतच्या तक्रारी शाळेतून आल्या की पालक हतबल किंवा रागाच्या तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतात . अशी समस्या उद्भवण्यामागे अध्ययन अक्षमता हे कारण असू शकते . अशा कारणांची उकल करणाऱ्या व समस्या निवारण्याचे मार्ग दाखवणारा पालक

आणि शिक्षकांना उपयुक्त अशा चर्चासत्राचे आयोजन 'सुश्री फाऊंडेशन' मार्फत करण्यात आले . कार्यक्रमात तीन संस्था अशा समस्यांवर विविध स्तरांमधून कार्यरत आहेत त्या सहभागी झाल्या होत्या . प्रिझम फाऊंडेशन च्या हर्षा मुळे, डॉ . शांताबाई वैद्य प्रतिष्ठान च्या क्षिप्रा वैद्य , **सुमंत्र संस्थेच्या वैशाली बढे** आणि सुश्री संस्थेच्या अनिता आवटे यांनी या वक्त्यांशी संवाद साधला . अनुवंशिकता, जन्म वेळी झालेल्या मेंदूतील गुंतागुंतीमुळे मेंदूची काम करण्याची पद्धत बदलते . त्याचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम होऊ शकतो . तसेच शालेय शिक्षण आणि उपचाराधिष्टीत अध्यापना मधील फरक स्पष्ट करत मुलांसाठी वापरल्या जाणाऱ्या मानस शास्त्रीय चाचण्यांची माहिती यावेळी देण्यात आली . अध्ययन अक्षमतेवर मात करून यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांची उदाहरणेही सांगण्यात आली . हे चर्चा सत्र सह्याद्री सदन , टिळक रोड येथे १४ सप्टेंबर रोजी संपन्न झाले . अध्ययन अक्षमतेच्या प्रश्नावर जाणीव निर्माण करण्यात हा कार्यक्रम यशस्वी झाला .

**स्थानिक वर्तमानपत्रात बातमी आल्यामुळे सर्वदूर पोहचता आले .**



## अध्ययन अक्षमतेबाबत शनिवारी मार्गदर्शन सत्र

**प्रतिनिधी, पुणे**


**विद्यार्थ्यांच्या शिक्षण** प्रक्रियेत अडसर ठरणाऱ्या अध्ययन अक्षमतेबाबत (लर्निंग डिसॲबिलिटी) सुश्री फाऊंडेशनतर्फे शनिवारी (१४ सप्टेंबर) मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सदाशिव पेठेतील विशाल सह्याद्री सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होणार असून अध्ययन अक्षमतेच्या कारणांची तज्ज्ञांकडून उकल करतानाच त्यावरील उपायांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

सुश्री फाऊंडेशनच्या 'आरसा समाजमनाचा' या उपक्रमाअंतर्गत हा कार्यक्रम होईल. कार्यक्रमाला प्रीझम फाऊंडेशन, डॉ. शांता वैद्य प्रतिष्ठान, सुमंत्र सेंटर यांनी सहकार्य केले आहे. कार्यक्रमात हर्षा मुळे, क्षिप्रा रोहित, वैशाली बढे यांच्याशी अनिता आवटे संवाद साधणार आहेत.

मुलांच्या अभ्यास न करण्यामागे काही कारणे असू शकतात. तसेच बौद्धिक, मानसिक कारणेही असू शकतात.

पण हे न कळल्याने पालक हतबल होऊन मुलांना मारतात. विद्यार्थ्यांच्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी आधी त्यांना समजून घेतले पाहिजे. त्या विषयी या कार्यक्रमात मार्गदर्शन केले जाईल. कार्यक्रमाला प्रवेश विनामूल्य आहे.

लोकसत्ता Thu, 12 September 2019
https://epaper.loksatta.com/c/43487829



स्नेह निमंत्रण

सुश्री फाउंडेशन सेतू आपुलकीचा...

सुश्री फाउंडेशन या सामाजिक संस्थेमार्फत
**'आरसा समाजमनाचा'** या उपक्रमांतर्गत मुलांच्या वाढीमध्ये अडसर ठरणाऱ्या समस्यांवर मार्गदर्शन करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुलांच्या प्रगतीमध्ये कोणतीही बाधा येऊ नये म्हणून पालक जागरूक असतात. असे असताना मुलांच्या अभ्यासाबाबतच्या तक्रारी शाळेतून आल्या, की एकतर पालक हतबल होतात किंवा आपले मूल नीट अभ्यास करीत नाही, उनाडपणा करते म्हणून त्याला मारतात देखील. पण ते असे का वागते याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. बौद्धिक पातळीवरची एखादी समस्या तसेच त्याच्या वर्तनातील एखादी समस्या उद्भवण्यामागे काही कारणे असू शकतात. अध्ययन अक्षमता (लर्निंग डिफिकल्टी) हे देखील त्यातील एक कारण असू शकते. अशा कारणांची उकल करणाऱ्या आणि समस्या निवारण्याचे मार्ग दाखविणारा हा कार्यक्रम आहे.
या कार्यक्रमाला आपण आवर्जून उपस्थित राहावे.

- सहभागी सामाजिक संस्था ।
**प्रीझम फाउंडेशन । डॉ. शांता वैद्य फाउंडेशन । सुमंत्र सेंटर**
- सहभाग । **हर्षा मुळे, क्षिप्रा रोहित, वैशाली बढे** । संवादक । **अनिता आवटे**
- दिनांक । **शनिवार, १४ सप्टेंबर २०१९**
- वेळ । **सायं. ५.३२ वा.**
- स्थळ । **विशाल सह्याद्री,**
२०४४, सदाशिव पेठ,
सह्याद्री सदन, विश्वेश्वर बँकेसमोर,
टिळक रस्ता अभिनव महाविद्यालयाच्या मागे,
विश्व हॉटेल ते गिरिजा रस्ता.

कार्यक्रम वेळेत सुरू होईल.
कार्यक्रम कालावधी १ तास ३० मिनिटे.
प्रवेश विनामूल्य.
संपर्क : ९७६७४३४९९२



## 'अध्ययन अक्षमते'वर चर्चासत्राला प्रतिसाद

पुणे, ता. १५ : मुलांमध्ये आढळणाऱ्या अध्ययन अक्षमतेवर 'आरसा सामाजिक मनाचा' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'सुश्री फाउंडेशन' या सामाजिक संस्थेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या हर्षा मुळे, क्षिप्रा रोहित, वैशाली बढे यांची मुलाखत घेण्यात आली. अनिता आवटे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. आनुवंशिकता, त्याचप्रमाणे जन्माच्यावेळी झालेली मेंदूची गुंतागुंत यामुळे मुलांमध्ये अध्ययन अक्षमता जाणवते. अध्ययन अक्षमतेवर मात करून मुले यशस्वी होऊ शकतात, असा विश्वास या वेळी तज्ज्ञांनी व्यक्त केला.




**(उजवीकडून) सुमंत्र संस्थेच्या रेमेडियल विभाग प्रमुख वैशाली बढे , प्रिझम फौंडेशन च्या हर्षा मुळ्ये, व वैद्य प्रतिष्ठान च्या क्षिप्रा रोहित परिसंवादात भाग घेताना**

पौड रोड येथील एम आय टी शाळेच्या मुख्याध्यापिका नीलम वाघ प्रायमरी विभागाच्या विकासासाठी नव नवे बोधप्रद उपक्रम घेत असतात . अशा एका आगळ्या वेगळ्या अभिनव प्रश्न मंजुषेच्या कार्यक्रमकरिता त्यांनी सुमंत्र संस्थेच्या मानसतज्ञ यशश्री हुद्दार यांना पालकांशी व मुलांशी संवाद साधण्यासाठी आमंत्रित केले . मुलांनी पालकांना प्रश्न विचारायचे , पालकांनी उत्तरं द्यायची व त्यावर मानस शास्त्रीय दृष्टिकोनातून यशश्री ताईंनी विश्लेषण करायचं, अशा पद्धतींनी हि प्रश्न मंजुषा पूर्ण केली. १३५ पालक सभेसाठी उपस्थित होते . पालकांनी आणि मुलांनी मोकळेपणाने प्रश्नोत्तरे केली . कार्यक्रम सुरस आणि माहितीपूर्ण झाला . कार्यक्रम छान झाल्याचे मुख्याध्यापिका नीलम ताईंनी संस्थेला कळवले. शाळेतील श्री . कैलास शिंदे सरांनी खूपच बोलकी प्रतिक्रिया यशश्री ताईंना पाठवली . ती अशी ----

**"आम्हाला काही बोलायचंय"** या कार्यक्रमात आपल्याला निमंत्रण दिल्यानंतर ते स्वीकारून, आपण ज्या पद्धतीने पालकांशी व विद्यार्थ्यांशी संवाद साधून, त्यांच्या हृदयात घर करून, त्यांची मने जिंकलीत, त्याची प्रचिती काल कार्यक्रम संपल्यानंतर, त्यांची आई बाबां बरोबर झालेली चर्चा ऐकून मनाला खूप प्रसन्न वाटले. खरे तर या कार्यक्रमाचे सर्व श्रेय आपल्याला जात आहे ..... असेच मार्गदर्शन आम्हाला कायम सतत मिळत राहो .. ही अपेक्षा ठेवून आपले ऋण व्यक्त करतो ...."

सकाळ

## ‘आम्हाला काही बोलायचंय’मध्ये चिमुकल्यांनी मांडल्या कैफियती

**बावधन, ता. ३ :** कोथरूड येथील माईर्स एमआयटीच्या श्री शारदा प्राथमिक विद्यालयात ‘आम्हाला काही बोलायचंय’ हा पालक आणि बालकांच्या मनातील मुक्तसंवादासाठी अभिनव कार्यक्रम झाला. आमचे मम्मी-पप्पा नुसतेच टीव्ही आणि मोबाईल बघतात, आमच्याकडे लक्षच देत नाहीत, खेळायला नेत नाही, अशी कैफियत चिमुरड्यांनी मांडली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलम वाघ यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मानसोपचारतज्ज्ञ यशश्री हुद्दार यांनी मुलांच्या व पालकांच्या प्रश्नांची उत्तरे सहज सोप्या भाषेत दिली. मुलांना बोलते केल्यानंतर त्यांनी आपल्या लडीवाळ भाषेत पालकांबाबत तक्रारी केल्या. त्या ऐकत असताना अनेक पालकांचे हृदय हेलावले, तर काही मिस्कील प्रश्न ऐकून हसूही आवरले नाही.

पालकांनीही मुलांची अभ्यासात गोडी वाढावी, एकाग्रशक्ती वाढावी यासाठी काय केले पाहिजे, याविषयी हुद्दार यांच्याकडून माहिती घेतली. हुद्दार यांनीही मुलांवर लहानपणापासून सहजपद्धतीने कसे संस्कार केले पाहिजे, याचे विवेचन केले. त्यामुळे पालकही आपल्या मुलांविषयी जागृत झाले. कैलास शिंदे, मनीषा मुंडे, शीला अढागळे, माधुरी पाटे यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

Pune, Pune-Today
04/12/2019 Page No. 4



**एम.आय.टी. शाळेतील मुले**



**एम आय टी मुख्याध्यापिका यांच्या हस्ते सुमंत्र संस्थेच्या मानस तज्ञ यशश्री हुद्दार यांचा सत्कार.**

## शालेय रेमेडियल वर्गांचा अहवाल

जुलै २०१९ ते फेब्रुवारी २०२० या दरम्यान महाराष्ट्र विद्या मंडळाच्या परांजपे मराठी प्राथमिक विद्यालय, law college road येथे सुमंत्र संस्थेतर्फे समुपदेशन केंद्र व रेमेडिअल वर्ग घेण्यात आले. हे केंद्र सुरु करण्याकरिता सुमंत्रच्या जनरल बॉडी मेंबर संध्याताई पन्हाळकर यांची अमूल्य मदत झाली. कोथरूड, पौड रोड, बावधन, हिंजवडी, डेक्कन या परिसरातील विविध शाळांना भेटी देऊन संध्याताईंनी सुमंत्र संस्थेचे ची माहिती देण्यास मदत केली. या केंद्राकरिता **आर्थिक सहाय्य श्री. एल. आर. गणेशन** यांच्याकडून मिळाले.

परांजपे शाळेकरिता समुपदेशकाची जबाबदारी संस्थेच्या मानसतज्ञ यशश्री हुद्दार यांनी सांभाळली व रेमेडियल चे वर्ग दिपाली नेमाडे , कीर्ती नारखेडे व प्रज्ञा वाघ या तीन शिक्षिकांनी घेतले.

समुपदेशक यशश्री ताईंनी शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांच्या संदर्भात सत्रे घेतली. याच बरोबर समुपदेशनाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी शिक्षकांबरोबर एक वेगळे सत्र घेतले. त्यात समस्या केव्हा म्हणावे, शिक्षक कोणत्या समस्यांवर काम करू शकतात, कोणत्या समस्या त्यांनी समुपदेशकाकडे पाठवायला हव्यात, या बद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. प्रशालेतील पालकांबरोबर एक सभा घेण्यात आली.पालक सभेत मुख्याध्यापिका सुषमा ताई

भोसले यांनी सुमंत्र च्या मानसतज्ञ व सर्व शिक्षकांचे कौतुक केले व पुढील वर्षीही हा प्रकल्प सुरु ठेवण्याची इच्छा व्यक्त केली.











सुमंत्र संस्थेच्या अक्षर मैत्री प्रकल्पांतर्गत ज्या विद्यार्थ्यांबरोबर काम चालू आहे अशा पालकांची एक **विशेष सभा** बोलविण्यात आली होती. या सभेत पालकांना त्यांच्या मुलांच्या समस्या समजावून सांगण्यात आल्या व पालकांनी मुलांशी कसे वागावे याचेही मार्गदर्शन करण्यात आले. या सभेत साठी मानसतज्ञ यशश्री हुद्दार, रेमिडियल विभाग प्रमुख वैशाली बढे ,सुमंत्र च्या ट्रस्टी निकिता देशपांडे व रेमेडियल शिक्षिका दिपाली नेमाडे,कीर्ती नारखेडे,प्रज्ञा वाघ उपस्थित होत्या. पालकांनी त्यांच्या मुलांमध्ये सुधारणा दिसत आहे असे सांगितले.

सेवा सहयोग संस्थेच्या आर्थिक सहकार्यामुळे ज्ञानदा प्रशाला व सम्राट अशोक प्रशालेत रेमिडियल चे वर्ग घेण्यात आले. ज्ञानदा प्रशालेचे रेमेडियल वर्ग **प्रतिभा जगदाळे** यांनी घेतले. एकूण २९ मुले होती. या शाळेत एकंदरीत ७ महिने रेमिडियल सेशन्स घेण्यात आली. सुरुवातीला मुलांना अभ्यासाची आवड निर्माण व्हावी म्हणून इतर

खेळ,गोष्टी, रंगकाम देण्यात आले. प्रत्येक मुलाचा अभ्यास त्याच्या/तिच्या क्षमते प्रमाणे आखण्यात आला. सर्व मुलांनी तोंडी अभ्यासात उत्तम प्रगती दाखवली. प्रतिभा ताईंनी मुलांकडून  विविध प्रकारच्या कृती करून घेतल्या. बुकमार्क बनविणे, क्ले पासून गणपती बनविणे, पणती पेंटिंग, निरनिराळे पझल सोडवणे, सणवार माहिती देऊन ते खाऊ देऊन साजरे करणे. सुमंत्र ची दिवाळी ऑडिओ क्लिप मुलांना एकवणे, प्रश्न उत्तरे इत्यादी. सुमंत्र चे ब्रीद वाक्य आहे ‘आनंदी शिक्षक आनंदी मुले’ हे प्रतिभा ताईंच्या बाबतीत अगदी खरे आहे.







सम्राट अशोक प्रशालेचे  रेमिडियल वर्ग **आसावरी गोगटे, सुकन्या कुलकर्णी व अपर्णा धर्माधिकारी** या तीन शिक्षिकांनी घेतले. एकूण २९ मुले होती. या शाळेत नोव्हेंबर महिन्यात रेमिडियल वर्ग सुरु झाले. रेमिडियल सेशन्स करिता  ४ महिने हा फारच छोटा काळ आहे तरीही या तिन्ही शिक्षिकांनी मुलांमध्ये समाधानकारक प्रगती आणून

दाखवली. तोंडी अभ्यासात सर्व मुलांनी चांगली प्रगती दाखवली. ४ विद्यार्थ्यांची I.Q. test घेण्यात आली आणि त्यांचा low borderline I.Q. निघाला. मुले आवडीने शाळेत येण्याचे प्रमाण या वर्गांमुळे वाढले आहे असे सम्राट शाळेच्या मुख्याध्यापिका सुनंदाताईंनी निरीक्षण करून सांगितले.





सुतारदरा वस्तीतील सभागृहात वस्तीतील मुलांकरिता पुन्हा वर्ग सुरु करण्यात आले. मध्यंतरी शिक्षिकेच्या अभावी हे वर्ग काही काळ बंद करण्यात आले होते. सिद्ध समाधी ट्रस्ट च्या आर्थिक सहकार्यामुळे हे वर्ग सुरु करता आले. येथील वर्ग चालवण्याची जवाबदारी **वैशाली नेमाडे व कीर्ती नारखेडे** या शिक्षिकांनी घेतली.





सुतारदरा येथील रेमेडियल वर्ग पुन्हा नव्या उत्साहाने सुरु झाले. कीर्ती ताई आणि वैशाली ताई यांनी प्रत्येक मुलाच्या गरजेप्रमाणे अभ्यासक्रम ठरवून शिकवायला सुरुवात केली. सुमंत्र बॅग मधील साहित्य वापरून वर्ग तर घेतलेच शिवाय स्वतःची कल्पकता वापरून निरनिराळ्या संकल्पना निरनिराळी साधने वापरून पण केले. वस्तीत वर्ग चालविणे हे अतिशय आव्हानात्मक काम असते. कारण जिथे शिकवायचे त्या हॉल मध्ये अधून मधून काही कार्यक्रम असतात मग मुलांचे लक्ष लागणे अवघड असते.शिवाय तिथे वेग वेगळ्या वर्गातील मुले/मुली यायची,

त्याप्रमाणे अभ्यास तयार करून सराव घ्यावा लागायचा. नित्य बदलणाऱ्या परिस्थितीतही वैशाली ताई आणि कीर्ती ताईंनी नेटाने शिकविले. फिल्म दाखवणे व नंतर त्यावर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम घेणे असे कल्पक कार्यक्रम ही घेतले. किष्किंधा नगर येथील वर्ग सुरु ठेवण्यात काही अडचणी आल्या. वर्ग घेण्यास जागा मिळत नव्हती, त्यामुळे विद्यार्थी संख्या रोडावली या व्यतिरिक्त पुरेसे आर्थिक साहाय्य न मिळाल्यामुळे किष्किंधा नगर येथील वर्ग बंद करण्यात आले.

अक्षर मैत्री प्रकल्पात सहभागी सर्व शिक्षिकांचे मनःपूर्वक कौतुक वाटते कारण शिकविण्याच्या कले बरोबरच मुलांविषयी आस्था, प्रेम, संयम या गुणांची खूप आवश्यकता असते. आमच्या सर्व शिक्षिका व विभाग प्रमुख ही जवाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत. अक्षर मैत्री प्रकल्पातील मुलांच्या वर्तन समस्यांवर सुमंत्र च्या मानसतज्ञ भावना शिराळकर कुशलतेने वर्तनोपचार करतात. त्या करिता आवश्यकतेप्रमाणे त्या प्ले थेरपी घेतात. सुमंत्र च्या "मानस" प्रकल्पात त्या सर्व प्रकारच्या मानसशास्त्रीय चाचण्या घेतात.

## **इतर महत्वाचे कार्यक्रम** :

१६ जून ला रंगत-संगत व करम प्रतिष्ठान तर्फे सुमंत्र संस्थेच्या संचालिका विनया भोसेकर यांचा मान्यवर समुपदेशक म्हणून सत्कार करण्यात आला. वैवाहिक समुपदेशन क्षेत्रात ३५ वर्षांचा त्यांचा अनुभव मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्त्री मुक्ती संघटना ,चेतना महिला विकास केंद्र, आणि सुमंत्र संस्थेत समुपदेशनाचे काम करण्याचा त्यांना ३५ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव आहे.




**मानस तज्ञ प्रसन्न रबडे यांच्या हस्ते मानचिन्ह स्वीकारताना विनया भोसेकर**

जुलै महिन्यात राजा शिवराय प्रतिष्ठानच्या श्री. सदगुरु बाबा महाराज सहस्त्रबुद्धे विद्यामंदिर येथे शालेय व्यवस्थापन समितीत सुमंत्र संस्थेच्या अध्यक्षा विनया भोसेकर यांची **सामाजिक कार्यकर्ता प्रतिनिधी** म्हणून निवड करण्यात आली.सुमंत्रच्या जनरल बॉडी मेंबर आसावरी गोगटे यांचा सत्कार करण्यात आला.




**मुख्याध्यापिका सौ. स्वाती जोशी हस्ते विनया भोसेकर यांचा सत्कार**




**मुख्याध्यापिका सौ. स्वाती जोशी हस्ते आसावरी गोगटे यांचा सत्कार**

## सुमंत्र शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

शनिवार दिनांक १७ ऑगस्ट रोजी सुमंत्र शिक्षकांसाठी व स्वयंसेवकांसाठी शुद्धलेखन वर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. मुलांचे शुद्धलेखन कसे असावे , शुद्धलेखनाचे नियम याबद्दल या कार्यशाळेत माहिती देण्यात आली. श्रीमती पावनी भावे यांनी ही कार्यशाळा घेतली. सर्व सहभागी शिक्षिकाना खूप उपयुक्त ठरली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात कसे शिकवावे याचे धडे मिळाले. पावनी मॅडम सारख्या कल्पक शिक्षिका सुमंत्र संस्थेशी जोडल्या गेल्या म्हणून सर्वांनी समाधान व्यक्त केले.



**पावनी भावे प्रशिक्षण घेताना**




**सहभागी रेमेडियल शिक्षिका**

११ ऑक्टोबर २०१९ रोजी **सुमंत्र संस्थेच्या रेमिडियल प्रशिक्षक जान्हवी कुळकर्णी** यांनी विझूअल परसेप्शन या विषयाची कार्यशाळा घेतली. डिस्लेक्सिया असलेल्या मुलांना अक्षरात अंतर,लिहिताना पेनसिलीला किती प्रेशर द्यायचे हे कळत नाही त्यामुळे त्यांच्या कडून चुका होतात या साठी विझूअल परसेप्शन चे सहा प्रकार समजावून सांगण्यात आले. या सहा प्रकारातून डिस्लेक्सिया असणाऱ्या मुलांमध्ये किती वेग वेगळ्या प्रकारचे प्रॉब्लेम असतात व त्यावर मात कशी करायची हे कार्यशाळेत समजावून सांगण्यात आले. जान्हवी ताईंनी अतिशय उत्तम आणि उपयुक्त कार्यशाळा घेतली असे सर्व शिक्षिका म्हणाल्या.

३ डिसेंम्बर २०१९ रोजी रेमेडियल वर्गातील मुलांचे वाचन कौशल्य सुधारणे आणि "मुलांना गोष्ट कशी सांगायची" या विषयी ची कार्यशाळा **सुमंत्र संस्थेच्या मानसतज्ञ अपर्णा धर्माधिकारी** यांनी घेतली. मुलांना गोष्ट सांगण्याचे महत्व , ती प्रभावीपणे कशी सांगायची, त्यात अभिनय कसा आणायचा असे मुद्दे अपर्णा ताईंनी खूप छान समजावून सांगितले. अशा प्रकारे सुमंत्र संस्थेत शिक्षकांचे कौशल्य वाढण्यासाठी प्रयत्न केले जातात.





**अपर्णा धर्माधिकारी प्रशिक्षण घेताना** **जान्हवी कुळकर्णी प्रशिक्षण घेताना**

**सुमंत्र संस्था आणि लायन्स क्लब ऑफ पुणे 'मनस्वी**' यांच्या संयुक्त विद्यमाने कोथरूड येथील सुतारदार वस्ती मधील मुलांसाठी बाल मेळावा आयोजित करण्यात आला होता . या वस्तीतील सुतार सभागृहात ३ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ४ या वेळात हा कार्यक्रम पार पडला . रेमिडियल शिक्षिका वैशाली नेमाडे यांनी पुढाकार घेऊन मुलांची मोफत डोळे तपासणी उपक्रम आयोजित केला. त्या नंतर मुलांना खाऊ वाटप करण्यात आले . मनस्वी चे ऑप्टिशियन श्री. अस्लम यांनी मुलांचे डोळे तपासले . त्यातील काही मुलांना चष्मा लावावा लागेल असेही या तपासणीतून निष्पन्न झाले आहे . ज्या मुलांना चष्मा लागणार आहे त्यांची पुढील तपासणी मोफत करून त्यांना अत्यल्प किमतीत चष्मे दिले जातील असे लायन्स क्लब च्या प्रेसिडेंट नी सांगितले .





या कार्यक्रमाला लायन्स क्लब ऑफ पुणे मनस्वी च्या प्रेसिडेंट अडव्होकेट प्रीती परांजपे , सेक्रेटरी धनश्री आठल्ये , चेयर पर्सन ऑफ सर्विसेस कांचन दोडे उपस्थित होत्या. सुमंत्र च्या कोषाध्यक्ष वैशाली बढे , रेमिडियल शिक्षिका वैशाली नेमाडे , दीपाली नेमाडे , कीर्ती नारखेडे ,सुकन्या कुलकर्णी , व इतर कार्यकर्त्या डॉ . मनीषा कावतकर , आरती फडणीस , कल्याणी सदावर्ते , मानस तज्ज्ञ यशश्री हुद्दार या सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला .




**लायन्स क्लब चे मानद अधिकारी व सुमंत्र संस्थेचे विश्वस्त आणि कार्यकर्ते**

ऑक्टोबर संपूर्ण महिना जागतिक '**डिसलेक्सिया अवेअरनेस**' या नावानी जगभरात जाणला जातो. अध्ययन अक्षमतेबद्दल जाणीव-जागृती चे अनेकविध कार्यक्रम या क्षेत्रातील सामाजिक संस्थांमार्फत घेतले जातात . सुमंत्र

संस्थेमार्फत  'डीसलेक्सिया' बद्दल जन जागृती व्हावी म्हणून हा कार्यक्रम हाती घेण्यात आला . विविध शाळांमध्ये जाऊन तेथील शिक्षकांना डीसलेक्सिया म्हणजे काय , त्याची लक्षणे , कारणे आणि उपाय यावर माहिती दिली गेली .  सुमंत्र संस्थेच्या विश्वस्त व मानसतज्ञ अपर्णा धर्माधिकारी यांनी ज्ञानदा प्रतिष्ठान संचलित  डी . आर . नगरकर प्रशाला, पुणे महानगरपालिकेची सम्राट अशोक प्रशाला आणि महाराष्ट्र विद्या मंडळाची परांजपे प्राथमिक प्रशाला येथे जाऊन शिक्षकांना आपल्या शांत मधुर स्वरात  सविस्तर माहिती दिली. यासाठी त्यांनी एका  अनामिक कवीची कविता वाचून दाखवली , त्यात डिसलेक्सिया  ची सगळी लक्षणे स्पष्ट होतात . या वेळी  शिक्षकांनी विचारलेल्या शंकांचे निरसन अपर्णाताई यांनी केले. पोस्टर प्रदर्शन व चर्चा असे या सभेचे स्वरूप होते . शिक्षकांनी या विषयातील त्यांचे अनुभव सांगितले . समस्येकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन  मिळाला असा फीडबॅक शिक्षकांनी दिला.



**शालेय शिक्षिका सत्र ऐकताना**



**अपर्णा धर्माधिकारी शाळेत  सत्र घेताना**

ज्या १४ नोव्हेंम्बर २००५ रोजी सुमंत्र सायकॉलॉजीकल कौन्सेलिंग सेंटरची अनौपचारिक  स्थापना झाली. तो १४ नोव्हेम्बर  स्वर्गीय . पंडित  जवाहरलाल नेहरू  यांचा जन्मदिन,  संपूर्ण भारतात  'बाल दिन ' या नावाने साजरा केला जातो . या दिनाचे औचित्य साधून दर वर्षी प्रमाणे वस्तीतील मुलांना  संस्थेची माहिती सांगण्यात आली, खाऊ देण्यात आला  व मनोरंजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या वर्षी संस्थेला १४ वर्षे पूर्ण झाली म्हणून सेंटर वर कार्यकर्त्यांची मीटिंग घेतली व  "मागे वळून बघताना" या शिर्षकाचे एक छोटेसे भाषण संस्थेच्या **विश्वस्त वृषाली बिवरे** यांनी केले. ज्या शाळांमध्ये सुमंत्र संस्थेचे वर्ग चालतात तिथेही शिक्षिकांनी  मुलांसाठी कार्यक्रम घेतले. या वर्षी संस्थेच्या कार्यकर्त्या **रेश्मा अलुरकर व त्यांच्या मैत्रिणींनी** खाऊ व खेळण्यांचे  वाटप केले.

दरवर्षी **कै. अण्णा भाऊ साठे** स्मृती प्रित्यर्थ **"नॅशनल आरकाईव्ह फिल्म इन्स्टिट्यूट"**, लॉ कॉलेज रोड, येथे लघु चित्रपट महोत्सव साजरा केला जातो. **या वर्षी सुमंत्र संस्थेवर तयार केलेला डॉ. मनीषा कावतकर निर्मित व दिग्दर्शित लघु चित्रपट 'अक्षर मैत्री 'याची निवड झाली व ६ व्या क्रमांकावर चित्रपट दाखविण्यात आला .** संयोजक म्हणाले हा विषय निराळा वाटला आणि तो सर्वांपर्यंत पोहचावा म्हणून निवड केली. ही निश्चितच संस्थेसाठी अभिमानाची गोष्ट ठरली. यामुळे सुमंत्र संस्थेची ओळख इतर सामाजिक संस्थांनाही झाली.



अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव समिती आणि निर्मीती मिडिया आयोजित

तृतीय अण्णा भाऊ साठे

आंतरराष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सव पुणे 2019

3rd Annabhau Sathe International Short Film Festival Pune 2019

Screening Schedule

Sat 16 November 2019 Screening Schedule Morning 10:00 am to 1:30 PM

| Sr. No. | Name of the film | Name of the Director | Language | Country of origin | Running Time |
|---|---|---|---|---|---|
| 1 | The silence outside | Balázs Pethő | Hungarian | Hungary | 21 minutes 30 Seconds |
| 2 | Dogma | Omkar Modgi | Marathi | India | 10:00 minutes 29 Second |
| 3 | Circle | Rohit Nanavare | Marathi | India | 18 minutes 02 Seconds |
| 4 | Tarikh | Atul jain | Marathi | India | 13 minutes 23Seconds |
| 5 | Gentleman | Shrikant Jamunde | Hindi | India | 15 minutes37 Seconds |
| 6 | AKSHAR MAITRI ( Documentry ) | Manisha Kavatkar | Marathi | India | 13 minutes 06 Second |
| 7 | Aparadhees | Vinay kumar P | Malayalam | India | 15 minutes53Seconds |
| 8 | FEEL THE RHYTHM | rahel t yohannes | English | United Kingdom | 20 minutes 43 Seconds |
| 9 | SUNDRI. | Vivek Karate | Marathi | India | 19 minutes 58 Seconds |
| 10 | Pullanji | Vinod kumar | Malayalam | India | 16 Minutes 8 Seconds |
| | Lunch Break 1:30 PM to 2:00 pm | | | | |
| 11 | Authenticity: Five Paths of Ayurveda ( Documentry) | Wesley Shrum | English | India | 18 minutes 41 seconds |
| 12 | Democracy | aditya agnihotri | Hindi | India | 12 minutes 47 Seconds |
| 13 | Khel Mandala | Sambhaji Jadhav | Marathi | India | 9 Minutes |
| 14 | Increase | Rohidas Somvanshi | Marathi | India | 3 minutes 22 Second |
| 15 | Zero notc | athraa yaseen | kurdish | Iraq | 4 minutes |
| 16 | Kashti | Hritik Sanghavi | Hindi | India | 10 minutes 06 Seconds |
| 17 | TRANSCEND 2019 ( Documentry ) | Satyajeet Ojha | English | India | 5minutes57 Second |
| 18 | Rutuja | KARAN . N LUNGADE | Marathi | India | 19 minutes 54 Second |
| 19 | Padur | Navnath Kamble | Marathi | India | 13 minutes 50 Second |
| | Tea Break 3:45 to 4:00 pm | | | | |
| 20 | Jivashma (Fossil) | Jitendra Ghatge | Marathi | India | 15 minutes 47 Seconds |
| 21 | Mnzoor Hai | Deepali Awkale | Hindi | India | 9 minutes |
| 22 | Devil's Dust | Ganesh Sharma | English | United Kingdom | 16 minutes 32 Seconds |
| 23 | The Man Who Saved LKY ( Documentry ) | Thomas Franks | English | Singapore | 6 minutes 29 seconds |
| 24 | VALARI (The Boomerang) | Jayakumar Barade | Tamil | India | 22 minutes 42 seconds |
| 25 | w | Rajesh Kumar Mohanty | Hindi | India | 9 minutes 4 seconds |
| | Sun 17 November 2019 , 10:00 am to 1:30pm | | | | |
| 26 | krampon Cleats | Abdullah Şahin | Turkish | Turkey | 10 minutes 30 Seconds |
| 27 | What If | Mayur Thorat | Marathi | India | 5 minutes |
| 28 | One More Reason | Pratik Shah | Hindi | India | 13 minutes 13 Seconds |
| 29 | Persona | Ankit kulkarni | Marathi | India | 5 minutes 52Second |
| 30 | The waiting | Sabarivasan Shanmugam | Tamil | India - Chennai | 23 minutes 26Seconds |
| 31 | DECAY | Aditya Chavan | Marathi | Indai | 14 minutes 41 Seconds |
| 32 | Vitha | Avishkar Bharadwaj | Marathi | India | 15 minutes 33 seconds |
| 33 | Unsee | Joby Varghese | Malayalam | India | 5 minutes |
| 34 | AlertBa | Laxmikat Pandharinath Sutar | Hindi | India | 28 minutes 53 seconds |
| 35 | Sou Koumaryini | Kiran Wagh | Marathi | India | 23 minutes 48 Seconds |
| 36 | Wave | Dishant Soni | English, Hindi | India | 13 minutes 49 seconds |
| 37 | Ticket | ABHIK DAS | Silent | India | 14 minutes 59 seconds |
| 38 | ARABIAN NIGHTS | Sanat Ganu | Marathi | India | 29 minutes 59 Seconds |
| 39 | Fraction Of An Ounce | Alok Basnait | English, Hindi | India | 15 minutes 00 Seconds |
| 40 | The Life saver | Santosh Kamble | Marathi | India | 6 minutes 30 seconds |
| 41 | The Muse | Kshitij Vichare | Marathi | India | 15 minutes |
| | Lunch Break 1:30 to 2:00 pm | | | | |
| | Discussion on Hamid Dalwai "The Unsung Humanist" 2:00 PM to 3:00 PM | | | | |
| 42 | 2 RUPAIYE KA SIKKA | Pervez khan | Hindi | India | 6 minutes 52Second |
| 43 | Stree & Purush | Vijay Pashte | Marathi | India | 9 minutes 08 Seconds |
| 44 | Importanat | Siddhant Bhalerao | Silent | India | 53 Seconds |
| 45 | I killed a person | Nima Aghkhan | Iran | Persian | 27 minutes 38 Second |
| 46 | Lakshumi ( Documentry) | Akshay Kadam | Marathi | India | 15 minutes 11 Seconds |
| 47 | Uttarand | Duo Anana Shinde/ Ajit Bhopakar | Marathi | India | 8 minutes21 Second |
| 48 | Tea Break : | | | | |
| 49 | Entangled | Rasheesd Parambil | Malayalam | India | 4 minutes 59 Seconds |
| 50 | kavala ud | Ashutosh jare | Marathi | India | 21 minutes 45 Second |
| 51 | Ek MR Ki Maut | Prasad Namjoshi | Marathi | India | 25 minutes 50 Seconds |
| 52 | kumbhil shiva | vishal kumbhar | Hindi | India | 12 minutes 03 Seconds |
| 53 | Pamphlet | Shekhar Bapu Rankhambe | Marathi | India | 30 minutes |
| | Prize Distribution Ceremony 6 :00 pm to 8:00 pm | | | | |

३० डिसेंम्बर २०१९ रोजी संस्था भेटी साठी अमेरिकेमध्ये वास्तव्यास असणाऱ्या श्रीमती. अनुराधा केळकर व त्यांच्या मातोश्री मानसतज्ञ श्रीमती. आरती पसारकर आवर्जून आल्या होत्या. सुमंत्र संस्थेचे शाळेतील उपक्रम व संस्थेचे कार्य त्यांना आवडले , त्यांनी संस्थेला १०,०००/- रुपये देणगीही दिली.



**“एकल” संस्थेच्या अमेरिकेतील प्रतिनिधी सौ. अनुराधा केळकर यांची**

**- सुमंत्रच्या “सम्राट अशोक शाळेला” भेट**

**मन दर्पण** :






**देवतरु संस्थेतील ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम**

**संध्या छाया भिवविती हृदया** याची प्रचिती वृद्ध माणसांना प्रकर्षाने जाणवते . नकळत त्यांच्या मनात नैराश्य डोकावते . वृद्धापकाळ सुसह्य होण्याचा व उत्साह वाढवण्याचा 'सुमंत्र' देण्याकरिता एका कार्यक्रमाची आखणी करण्यात आली . सुमंत्र संस्था मानसिक आरोग्यावर ही काम करते . 'मन दर्पण ' या प्रकल्पांतर्गत ज्येष्ठांचे मानसिक आरोग्य चांगले राहण्याकरिता निराळ्या प्रकारचे कार्यक्रम घेण्याचे ठरले .समाजातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सुमंत्र संस्थेचे 'मुक्तसंवाद ' नावाच्या महिला समूहाबरोबर **देवतरु** या संस्थेकरिता काही कार्यक्रम घेण्याचे ठरले . संस्थेच्या स्वयंसेविका रेश्मा अलुरकर यांनी पुढाकार घेऊन दर शुक्रवारी संध्याकाळी ज्येष्ठांसाठी निरनिराळ्या कला सादर केल्या . त्यात कथा, म्युझिक थेरपी , नृत्य , गायन, वारली, मेडिटेशन , त्या त्या महिन्यातील सणाप्रमाणे माहिती , चर्चा असे बहुरंगी कार्यक्रम आयोजित करण्यात आले .मुक्तसंवाद मधील सहभागी मैत्रिणींनी खूपच उत्साहाने सहभाग घेतला . या उपक्रमाचे 'देवतरू' या संस्थेच्या संचालिका दीपा ताई यांनी कौतुक केले आणि सर्व वृद्धजन शुक्रवार ची उत्कंठेने वाट बघतात व कार्यक्रमांना छान प्रतिसाद देतात असे आढळून आले . या उपक्रमात सहभागी झालेल्या मैत्रिणीची नावे रेणू माडीवाले ,सुमन महाजन , संध्या वखारिया , राधा खोलकुटे , योगिनी फडतरे ,योगिनी कुलकर्णी , सुनीती भगली, सुवर्णा अदवंत ,ज्योती देशपांडे , प्रीती गोरे, स्वाती घोटीकर , वृषाली बिवरे (सुमंत्र ट्रस्टी) रेश्मा अलुरकर (सुमंत्र प्रशिक्षक )



आपल्या रोजच्या आयुष्यात आपल्याला बऱ्याच गोष्टींचा सामना करावा लागतो . आपल्याला असे वाटते की , या ताणाला माझी घरची परिस्थिती , जॉब ची परिस्थिती नवऱ्याचं किंवा बायकोचं वागणं इत्यादी अनेक गोष्टी जवाबदार आहेत . विचार , भावना व वर्तन याची सांगड घालतांना मानसिकरित्या आपण थकतो , राग , चिडचिड, दु:ख अपराधीपणा पश्चताप या भावनांनी आपण त्रस्त होतो .

'मन दर्पण ' या उपक्रमाअंतर्गत सुमंत्र संस्थेच्या प्रशिक्षक रेश्मा अलुरकर यांनी "स्वजागृती" कडून "सक्षम मी कडे वाटचाल" - "खरा मी ,आनंदी मी ,सक्षम मी" "स्वत:ला ओळखण्याचा प्रयास व प्रवास" हळुवारपणे उलगडून दाखवणारे **४ दिवसीय शिबिर** खास महिलांकरिता घेतले. मानस शास्त्रावर आधारित स्व-जाणीव जागृती ह्या विषयावर केंद्रित हे शिबिर होते. स्वतःमधील कमतरता ओळखणे , बलस्थानं ओळखून स्वत:ला अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हे शिबिर आयोजित केले . आपण शारीरिक, भावनिक, सामाजिक व अध्यात्मिक पातळीवर स्वत:ला समजण्याचा व आपल्या जगण्याचा दर्जा वाढवण्यासाठी काही कौशल्ये, काही टिप्स, विविधांगी चर्चा,

चित्रकला , कातरकाम अशी माध्यमे वापरली.  एप्रिल २०१९- मार्च २०२० या कालावधीत ही एकूण ३ शिबिरे घेण्यात आली . एकंदरीत २५ महिलांनी  यात सहभाग घेतला .



**मन सुदृढ व सशक्त करण्याच्या दृष्टीने सुमंत्र संस्था प्रयत्नशील असते.** बरेचदा आपण काही महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो त्यातील एक म्हणजे कृतज्ञता व्यक्त करणे किंवा मानणे. आपण आपल्या आयुष्यात कधीतरी कृतज्ञता निर्देशांक मोजण्याचा प्रयत्न करायला हवा आणि आपल्या लक्षात येते  की  आपण नशीबवान आहोत. आपण आपल्याला मिळणाऱ्या सुखसोयी गृहीत धरून कृतज्ञता व्यक्त करण्यास विसरून जातो . आमच्या संस्थेच्या प्रशिक्षक रेश्मा अलूरकर  यांना  कृतज्ञते वर एक कार्यक्रम  घेण्याची कल्पना सुचली  आणि  ‘Attitude of Gratitude’  निराळा विचार करायला लावणारा कार्यक्रम आयोजित केला .कृतज्ञता ही  भावना आपल्यात रुजविली , वाढवली तर आपल्यातील सकारात्मकता, आनंद , उत्साह , प्रेमळपणा , आस्था वाढीस लागून आपण आपले जीवन अधिक आनंदाने जगू शकतो असा संदेश देणारा हा कार्यक्रम उपयुक्त ठरला. पौड रोड येथील **अजंता अव्हेन्यू सोसायटी सभागृहात घेण्यात आलेल्या  या कार्यक्रमास  छान प्रतिसाद  मिळाला . सुमंत्र संस्थेच्या मानसतज्ञ यशश्री हुद्दार यांनी सूत्रसंचालन केले.  ३१ लोकांनी त्यामध्ये सहभाग घेतला.**



## आविष्कार :

**व्यक्तिमत्व विकास करिता लागणारी कौशल्य शिबिरे घेणे हा सुमंत्र संस्थेचा महत्वाचा उपक्रम आहे.** शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी कौशल्य विकास शिबिराची आवश्यकता असते .

यंदा आठवी व नववी इयत्तेतील विद्यार्थ्यांकरिता अभ्यास कौशल्य शिबिर सप्टेंबर -ऑक्टोबर महिन्यात घेण्यात आले . रश्मी पटवर्धन व यशश्री हुद्दार या दोन मानसतज्ञानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यात विद्यार्थ्यांना अभ्यास का करायचा (प्रेरणा) , केव्हा करायचा (वेळा पत्रक ) ,कसा करायचा (विविध कौशल्ये ), वाचन कसे असावे , वाचन वेग किती असावा , लक्षात ठेवण्याच्या पद्धती (स्मरण पद्धती ), माईंड मॅपिंग या विषयांबरोबरच स्वतःच्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी योग्य सवयी कशा हव्यात , व्यायामाचे महत्व हे विषय मांडण्यात आले.

अभ्यास कौशल्यांबरोबरच परीक्षेच्या बदललेल्या स्वरूपानुसार लेखन कौशल्य वाढविण्यासाठी देखील मार्गदर्शन करण्यात आले . यासाठी पौर्णिमा धारप यांनी परीक्षेतील निबंध, जाहिरात, पत्र, बातमी, वृत्तांत लेखन यावर सविस्तर मार्गदर्शन केले .

या सत्रांनंतर या विद्यार्थ्यांच्या पालकांची भेट घेऊन त्यांच्या पाल्यांच्या अभ्यास पद्धतींविषयी मार्गदर्शन केले. स्वतःच्या पाल्यांची बलस्थानं व कमतरता त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या . अशा संवादामुळे पालक व विद्यार्थी याना परीक्षेतील यशाची गुरुकिल्ली प्राप्त झाली

. एकूण ११ विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला . एकूण ५ दिवस हे शिबिर घेण्यात आले

.



**पौर्णिमा धारप सत्र घेताना**



**मानसतज्ञ रश्मी पटवर्धन सत्र घेताना**



**मानसतज्ञ यशश्री हुद्दार सत्र घेताना**

# List of Donors - April, 2019 - March, 2020

| | | |
|---|---|---|
| | **Name** | **Amount** |
| 1 | Smt.Aruna chandrashekhar | 57,000/- |
| 2 | Smt.S.Gayatri | 10,000/- |
| 3 | Shri.Atul.S.Nagras | 10,000/- |
| 4 | Smt.Pradnya Deshpande | 500/- |
| 5 | Shri Arvind Krishnaji Patil | 1001/- |
| 6 | Shri. Shridhar B.  Jahagirdar | 10,000/- |
| 7 | Smt. Vidya S.Patwardhan | 10,000/- |
| 8 | Shri. Nitin Ramesh Kulkarni | 2,000/- |
| 9 | Shri. Shardul A. Bhargav | 1,001/- |
| 10 | Smt. Vrunda Bhalerao | 10,000/- |
| 11 | Shri. A.S.Gopalkrishnan | 25,000/- |
| 12 | Smt. Shailaja Kulkarni | 1,000/- |
| 14 | Siddha Charitable Trust | 4,000/- |
| 15 | Seva Sahayog | 42,500/- |
| 16 | Smt. Reshma Alurkar | 2,800/- |
| 17 | Shri. L.R.Ganeshan | 50,000/- |
| 18 | Shri. Rajendra  Kawatkar | 5,000/- |
| 19 | Smt. Sunitee R.Bhagali | 5,000/- |
| | | |

## संस्थेला सहकार्य केलेल्या स्वयंसेवकांची नावे

### अक्षर मैत्री प्रकल्प :

**प्रमुख :** वैशाली बढे **मानतज्ञ** :अपर्णा धर्माधिकारी आणि भावना शिराळकर

१. वृषाली बिवरे २. जान्हवी कुळकर्णी ३. अनिता घाटणेकर ४. सुकन्या कुलकर्णी
५. आसावरी गोगटे ६. दीपाली नेमाडे ७. प्रतिभा जगदाळे ८. वैशाली वि.नेमाडे
९. स्वाती मोरे १०. कीर्ती नारखेडे ११. शैलजा जोशी १२. प्रज्ञा वाघ
१३. मेधा धायफुले १४. रेणू माडीवाले १५. सुनीती भगली १६. शिल्पा घाटणेकर
१७. डॉ मनीषा कावतकर १८. वैशाली नेमाडे १९. कल्याणी सदावर्ते २०. वैशाली शिराळकर
२१. मुक्षाली शिंदे २२. स्मिता देशपांडे २३. आरती फडणीस २४. अनुष्का कुलकर्णी
२५. डॉ. मेघा क्षीरसागर २६.संध्या पन्हाळकर २७. दीपाली जोशी २८. श्रुती यज्ञोपवीत
२९. निकिता देशपांडे ३०. श्रुती काळे

### मन दर्पण प्रकल्प :

**प्रमुख :** विनया भोसेकर **मानसतज्ञ** यशश्री हुद्दार **प्रशिक्षक :** रेश्मा अलूरकर
स्वयंसेविका
१. डॉ. मनीषा कावतकर २. संध्या वखारिया ३. रेणू माडीवाले ४. ज्योती भवाळकर
५. अश्विनी जोशी ६. राधा खोलकुटे ७. सुमन महाजन ८. योगिनी फडतरे ९. सुनीती भगली १०. योगिनी कुलकर्णी ११. सुवर्णा अदवंत १२. प्रीती गोरे १३. स्वाती घोटीकर १४. वृषाली बिवरे

### आविष्कार प्रकल्प :

**प्रमुख :** विभावरी बिडवे **विद्यार्थी प्रशिक्षक :** यशश्री हुद्दार , रश्मी पटवर्धन , पौर्णिमा धारप
**शिक्षक प्रशिक्षक -** पावनी भावे ,जान्हवी कुळकर्णी , अपर्णा धर्माधिकारी

## सुमंत्र संस्थेला मिळणारे आर्थिक साहाय्य :

अक्षर मैत्री प्रकल्प : श्रीमती. अरुणा चंद्रशेखर, सेवा सहयोग संस्था, ए.एस.गोपालक्रिष्णन, सिद्ध समाधी ट्रस्ट, श्री. अतुल नागरस, श्री. राजेंद्र कावतकर
एम व्ही एम परांजपे विद्यामंदिर समुपदेशन केंद्र : प्रायोजक श्री. एल.आर. गणेशन
आविष्कार प्रकल्प : श्री. श्रीधर भगवान जहागीरदार , श्रीमती. वृंदा भालेराव, श्रीमती.एस. गायत्री
सृजन आनंद उपचारात्मक शैक्षणिक साहित्य निर्मिती : श्री.अरविंद कृ.पाटील, डॉ. शैलजा कुलकर्णी, श्री. शार्दूल भार्गव, श्री. नितीन कुलकर्णी, श्रीमती. सुनीती भगली, श्रीमती. प्रज्ञा देशपांडे
सुमंत्र स्थापना दिन खाऊ वाटप : श्रीमती. रेश्मा अलुरकर आणि मैत्रिणी

**सुमंत्र संस्थेची लेखा परीक्षक :- वेदवती लेले**


## सुमंत्र सध्य स्थिती


सुमंत्र संस्थेच्या स्थापनेपासून अक्षर मैत्री हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचा उद्देश प्राथमिक शाळेत जाणा-या मुला मुलीं मधील अध्ययनातील अक्षमता असल्यास त्या शोधून त्याचे पूर्ण निराकरण करणे.
सुरवातीला २०१४ या वर्षापासून संस्थेचे काम कोथरूड च्या वस्तीत सुरु झाले व ते अजूनही चालले आहे .२०१८ पासून खाजगी शाळांमधून उपचारात्मक वर्ग घेतले जातात. हे काम अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने केले जाते . या करिता अभ्यासात अप्रगत मुले /मुली रेफर केली जातात. त्यांच्या मानस शास्त्रीय व शैक्षणिक चाचण्या घेतल्या जातात. समस्या असलेली मुले शोधल्यावर त्यांना आठवड्यातून दोन वेळेला शिकवायला रेमिडियल टीचर शाळेत किवा वस्तीत जातात. सुमंत्र संस्थेतर्फे प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षिका निराळी पद्धत अवलंबून मुलांना शिकवतात . त्याकरिता विविध प्रकारची शैक्षणिक साधने वापरली जातात. मुलांना काय शिकवायचे हे त्यांच्या विशिष्ट अडचणींवर ठरते आणि त्याबरहुकूम शिकवले जाते. एका निरीक्षण वहीत नोंदी केल्या जातात. सहा महिन्यातुन एकदा मोठी चाचणी घेतात . सातत्याने तीन वर्ष नियमित मुलांना शिकविल्यास अपेक्षित बदल दिसायला लागतात. लेखन वाचनात सुधारणा होते.
मन दर्पण प्रकल्पात निरनिराळ्या प्रशिक्षण कार्यशाळा चालतात. या कार्यशाळांना महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. २९ मार्च २०२० रोजी फिल्म आर्किव च्या हॉल मध्ये एक खास फिलमोत्सव प्रदर्शित करण्याचे आयोजित केले होते. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणाच्या शॉर्ट फिल्मस् दाखविण्याचे ठरले व त्यावर आधारित चर्चा घ्यायचे ठरले. परंतु हा कार्यक्रम कोविड लॉक डाऊन मुळे होऊ शकला नाही. या कार्यक्रमा साठी रेश्मा अलुरकर,यशश्री हुद्दार, रेणुका माडीवाले, संध्या वखारिया,ज्योती भवाळकर, विनया भोसेकर यांनी सविस्तर आखणी केली होती. हॉल शोधणे,फिल्म्स सिलेक्ट करणे, प्रायोजक मिळवणे इत्यादी भरपूर तयारी केली होती . स्त्री मुक्ती संघटनेच्या ट्रस्टी करुणा ताई गोखले आणि समन्वयक मुक्ता शिंगटे यांच्या बरोबर तयारीच्या बैठका पण घेतल्या होत्या , परंतु शेवटच्या क्षणी कार्यक्रम रद्द करावा लागला.

## भविष्यातील योजना

१.प्रत्येक शाळेत अध्ययन अक्षमतेची पालकांना व शिक्षकांना माहिती देणे.
२.वस्तीतील पालकांचे प्रबोधन करणे.
३.उपचारात्मक अध्यापनाचे प्रशिक्षण शिबिर घेणे.
४.यशदा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रेमेडियल एज्युकेशन सर्टिफिकेट कोर्स सुरु करणे.
५.सकस आहार विषयक शिबिरे शाळेत व वस्तीत घेणे.
६. विद्यार्थी कौशल्य विकास शिबीर घेणे.
७.ऑनलाईन रेमेडियल एज्युकेशन अभ्यासक्रम सुरु करणे.
८. मन दर्पण अंतर्गत मानसिक स्वास्थ्यासाठी काम करणाऱ्या संस्थांबरोबर संयुक्त उपक्रम घेणे.
९. ॲडव्हान्स सेल्फ अवेरनेस शिबिर घेणे.
१०.नवीन रेमेडियल किट तयार करणे.

## मुलांमधे झालेल्या बदलाच्या,  शिक्षकांनी केलेल्या नोंदी



## सुमंत्र संस्थेत रेमेडियल साठी आलेल्या मुलांच्या केस स्टडीज

**(१)**

**झाले मोकळे आकाश...**

मागे आपण सुमितची गोष्ट पहिली. सुमित प्रमाणेच अशी अनेक मुले आहेत ज्यांना अक्षर, अंक ओळखण्यात, लिहिण्यात अडचणी येतात. अक्षरं उलट सुलट लिहिले जातात. आणि गणित म्हणजे तर बागुलबुवा... बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार. दोन अंकी, तीन अंकी, हातचा... बापरे बाप... समजतच  नाही... + चिन्ह असताना x गुणाकार करणे. आणि हे मुद्दाम नाही बरं.. खरंच समजण्यात त्यांचा गोंधळ उडत असतो.

एक १०-११ वर्षा आधी रेवती(नाव बदलेलं आहे) सुमंत्र मध्ये आली,तिची गोष्ट सांगणार आहे. रेवतीला चौथी पर्यंत कसंबसं वर्गात ढकललं होतं. मज्जा म्हणजे कविता, धडे, भाषा रेवतीला खुप आवडत असत पण गणित म्हटलं की रेवतीची दांडी गुल... खुप चुका.. रेवती ला गणिताची भीती वाटू लागली होती. प्रत्येक परीक्षा, छोट्या छोट्या टेस्ट मध्ये शाळेतील गणिताच्या बाई तिचा पेपर लाल करून द्यायच्या. रेवतीच्या आईला बाईंनी बोलवून कौन्सेलर ची मदत घेण्याचा सल्ला दिला. शाळा मराठी, घरातलं वातावरण मराठी, घरी आई अभ्यास घेत असे. ट्यूशन लावली तरी परिस्थितीत सुधारणा नाही.

रेवतीच्या आईने आपली काळजी एका मैत्रिणी जवळ बोलून दाखवली. आणि त्या मैत्रिणीने रेवतीच्या आईला "सुमंत्र सायकॉलॉजीकल कौन्सेलींग सेंटर" चे  नाव सुचवलं.

रेवतीची आई सुरवातीला स्वतः सेंटर वर आली. रेवतीची अडचण तिने कौन्सेलर समोर मांडली. कौन्सेलरच्या लक्षात आले आणि त्यांनी रेवतीच्या आईची समजूत काढली. असे होणे म्हणजे रेवती Abnormal आहे किंवा तिच्यात काही Psychological (मानसिक) उणीव आहे असे अजिबात नाही. आणि त्यांनी Dyscalculia विषयी व त्याच्या लक्षणाविषयी सविस्तर माहिती दिली.

त्याचबरोबर रेमेडियल टीचींग नी ही समस्या काही काळाने दूर होऊ शकते हे ऐकुन रेवतीच्या आईला दाटलेल्या काळया आभाळात आशेचा किरण दिसला.

अडचण नक्की काय आहे आणि रेमेडिएशन ची गरज ओळखण्यासाठी तज्ञ सायकॉलॉजीस्ट यांनी रेवतीची टेस्ट करून, रेमेडिएशन च्या जागा विशद केल्या. त्याचबरोबर रेवतीचा कल भाषेकडे असल्याचे त्यांना लक्षात आले.

रेवतीचे रेमेडिएशन जसजसे पुढे जावू लागले, तिची गणिताची भीती कमी होवू लागली. गणिताची आवड नाही पण समाजण्याइतपत मैत्री झाली. १०वी ला ७२% घेवून रेवती पास झाली. इतर ठिकाणी ट्यूशनला जाण्यापेक्षा सुमंत्राच्या ताईंची ट्यूशन आवडू लागली.

१० वी नंतर आर्ट्स घेतले. आधीच भाषेची आवड असल्यामुळे कॉलेज मध्ये गेल्यावर तिला आपल्या भविष्याची दिशा सापडली. Additional भाषा German घेतली आणि German खूप मनापासून आवडू लागली, आत्मसात होऊ लागली.

कॉलेज पूर्ण करताना रानडे इन्स्टिट्यूट मधून German Courses करून आज रेवती एका IT कंपनीत German Translator ची नोकरी करत आहे, पाच आकडी पगार घेते आहे.

रेवती आणि रेवतीच्या आईला वाटते योग्य वेळी गोंधळाच्या वादळात अडकलेल्या त्यांच्या नावेला सुमंत्र ने तारून नेले. आजही त्या आपुलकीने संस्थेशी जोडल्या आहेत.

**रेमेडीअल शिक्षिका : वैशाली बढे**

**मानसतज्ञ: अपर्णा धर्माधिकारी**

**शब्दांकन: निकिता देशपांडे**

**(२)**

**गोष्ट विशालची**

ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय डिसलेक्सिया जाणीव जागृती चा महिना , ह्या निमित्ताने **विशाल** ची गोष्ट सादर करत आहोत.या मागील आमचा उद्देश असा आहे कि योग्य वेळी लक्षणं ओळखून अप्रगत मुला/मुलींना मदत मिळावी.

सात वर्षांचा चुणचुणीत विशाल २०१५ साली सुमंत्र सेन्टर वर आला .अर्थातच आई बरोबर .आई म्हणजे विशाल करिता साक्षात माउली. विशाल साठी विश्वास ठेवावा अशी त्या वेळी कदाचित एकमेव व्यक्ती. क्षणभर वाटलं अरे हा " तारे जमीन पर" मधला इशान च आहे जणू काही. त्याच्या सारखीच चेहऱ्याची ठेवण आणि तीच विलक्षण चलबिचल करणारी नजर.

पहिलीतला हा मुलगा माझ्या कडे रोखून बघत होता. डोळ्यात राग आणि विद्रोही नजर .त्याला क्षणात लक्षात आले ,कि आपण इतरांपेक्षा कुठेतरी वेगळे आहोत आणि आपल्याला जे जमत नाही त्या साठी आई आपल्याला या सेंटर वर घेऊन आली आहे. ही जाणीव करून देणारे अर्थात अप्रत्यक्ष आणि प्रत्यक्षपणे असतात घरातील सदस्य आणि शाळेत शिक्षक आणि इतर वर्ग मित्र. अभ्यास ,शाळा ह्याचा तिरस्कार करणारा आणि भन्नाट कल्पना शक्ती असलेला विशाल आपल्या साठी challenge असणार हे तेव्हाच लक्षात आले. उत्तम बुद्धिमत्ता ,गणितात उत्तम गती. पण वाचनात प्रचंड अडचणी त्यामुळे एकूणच अभ्यासात प्रगती नाही .

नेहमी प्रमाणे टेस्टिंग मध्ये severe dyslexia चे निदान झाले आणि आमचे प्रयत्न सुरु झाले.सर्वात आधी तर मी तुला मदत करणार आहे आणि तुझ्या मनाविरुद्ध काहीही करण्याचे दडपण नाही हा विश्वास विशाल ला देणे फार गरजेचे होते. काही दिवस आमची गट्टी जमण्यासाठी वाचनाचा उल्लेखच नाही केला .खेळ गप्पा आणि वेगवेगळ्या कृती करतांना जाणवले कि विशाल आता सेन्टर वर छान रमतो आहे .तो सेन्टर वर आनंदाने येऊ लागला .मग phonetics आणि visual discrimination activities ची हळू हळू सुरवात केली.

विशाल आता मोकळेपणाने त्याच्या अडचणी सांगू लागला . वाचनाचा ताण आला की मात्र तो वैतागायचा . किती सांगते वाचायला . ते words नुसते jumping करत असतात असे म्हणायचा. मोठे आवाज आणि भडक रंगांबद्दल खूप संवेदनशील होता. अशा वेळेस त्याच्या समस्येची जाणीव तीव्रतेने व्हायची.

खरंच का आपल्या प्रयत्नांना यश येईल असा विचार बरेच वेळा मनात घर करून राहायचा. पण त्याची आई ज्या धीराने आणि विश्वासाने त्याला सेन्टर वर आणायची तेव्हा पुन्हा नव्या उमेदीने प्रयत्न सुरु व्हायचे .

साधारण सहा महिने उलटल्यानंतर अचानक शब्दांची यादी वाचतांना b - a - t असे एक एक अक्षर अडखळत वाचणारा विशाल संपूर्ण शब्द बॅट आणि सलग बाकीचे शब्द ओळीने वाचू लागला . मला खूप आनंद झाला . त्याला आपण सहज वाचतो आहे याचा आनंद तर झालाच पण आपण हे करू शकलो यावर विश्वासच बसला नाही. त्याच्या साठी आणि माझ्या साठी सुद्धा हे खूप मोठे यश होते. कारण ज्या गोष्टी इतरांना इतक्या सहज पणे जमतात त्या आपल्याला येत नाही याचा खूप मोठा ताण त्या छोट्याशा मुलाला होता.

सेन्टर वर आला तेव्हा सर्व अक्षरांची ओळख देखील नव्हती . capital आणि small letters मध्ये confusion होते, वाचन तर खूप दूरची गोष्ट . लिखाणात हस्ताक्षर आणि वेग दोन्ही वर काम करावे लागणार होते. विशालचा आत्मविश्वास वाढायला याने खूप मदत झाली. त्यानंतर विशालची प्रगती मात्र वेगाने झाली. टप्पाटप्प्याने शाळेत मागितलेल्या सवलती कमी करण्यात आल्या. आज विशाल ७ वी इयत्तेत शाळेतील इतर मुलांबरोबर परीक्षा देतो. योग्य वेळी मदत मिळाल्या मुळे विशाल आज शिक्षणाचा आनंद सहज घेऊ शकतो.

विशाल च्या आईचेही खूप कौतुक वाटते कारण पती परदेशी असल्यामुळे एकटीने दोन मुलांच्या जवाब्दाऱ्या सांभाळून न वैतागता विशाल कडे विशेष लक्ष दिले व त्याची प्रगती साधली.

**रेमेडियल शिक्षिका : वैशाली बढे**
**शब्दांकन : वैशाली बढे**

(३)

**गोष्ट शुभमची**

जून 2019 ला अचानक खूप खूप दिवसांनी खरं तर वर्षांनी मला शुभम च्या आईचा फोन आला. शुभम ला दहावी मध्ये 78% पडले होते. आईचा आनंद गगनात मावत नव्हता. शुभमची ही प्रगती बघून मलाही खूप आनंद झाला. शुभमच्या या यशात आपलाही खारीचा वाटा आहे हे वाचून खूप बरं वाटलं. आणि मला त्याच्या जुन्या आठवणी मनात यायला लागल्या.

शुभम हा माझा रेमेडियल चा विद्यार्थी दोन वर्ष माझ्याकडे रेमेडियल साठी येत होता.
शुभम माझ्याकडे आला तेव्हा पाचवीत होता. नेहमी प्रमाणे शाळेने कौन्सिलिंग साठी पाठवले होते. आईवडिलांबरोबर आलेला शुभम तसा खूप बडबड्या आणि सतत काहीतरी करत राहणारा, स्वस्थ न बसणारा!
आपल्या मुलाला कौन्सिलिंग ची गरज आहे, काही टेस्ट कराव्या लागणार आहेत या गोष्टीने आई-वडील थोडेसे धास्तावले होते. मी टेस्ट केल्या आणि आणि शुभमला रेमेडियल ची गरज आहे हे लक्षात आले. शुभम ला जोड शब्द वाचतांना अडचणी यायच्या , वाचतांना तो अडखळत वाचायचा ब ,भ ,ढ, ड मध्ये गोंधळ करायचा , विराम चिन्ह लक्षात घ्यायचा नाही . शिक्षिकेने असे निरीक्षण पालकांना सांगितले होते.

आमच्या केंद्रात आल्यावर प्राथमिक सविस्तर माहिती लिहून घेतल्यावर शुभम ला चाचण्या देण्यात आल्या व पुढील उपचारात्मक सेशन ची आखणी केली.पालकांना नीट समजावून सांगितल्यावर शुभम कोणतीही गोष्ट मुद्दामहून करत नाही, ही डिसेबिलिटी आहे आणि आपण व्यवस्थित रेमेडियल केले तर शुभम च्या या अडचणी दूर होतील हे त्यांना पटले. तसेच हुशार आणि काहीही ही अडचणी नसणाऱ्या मोठ्या बहिणीशी त्याची तुलना करू नये;हे ही लक्षात आणून दिले. तसे पाहिले तर हुशारी आणि dyslexia चा संबंध नसतो. ज्या मुलांना वाचनात समस्या येतात त्या समस्यांना डीस्लेक्सीया म्हणतात . म्हणजेच भाषिक संवाद अक्षमता . मध्यवर्ती चेता संस्थेशी संबंधित ही समस्या आहे .

शुभम चुणचुणीत होता,आकलन चांगले होते आणि तरी सुदधा आपल्याला कमी मार्क पडतात याची जाणीव सुद्धा त्याला होती;हे ही लक्षात घेण्यासारखे आहे. शुभमचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे, स्वतःचे विचार स्वतःच्या आवडीनिवडी आहेत,तसेच काही चांगल्या क्षमताही आहेत; हे पालकांना मान्य झालं आणि मग पालकांचा संपूर्ण सहभाग मिळाला. आईने सुद्धा शिकवण्याच्या काही स्ट्रॅटजी ट्रेनिंग घेऊन शिकून घेतल्या. सगळ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे शक्य झालं.

**रेमेडियल शिक्षिका : वैशाली बढे**

**शब्दांकन : श्रुती काळे**

## संस्थेचे विश्वस्त मंडळ (Board of Trustees)


| | | |
|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | विनया अविनाश भोसेकर |
| 2 | उपाध्यक्ष | विभावरी वासुदेव बिडवे |
| 3 | सचिव | अपर्णा समीर धर्माधिकारी |
| 4 | कोषाध्यक्ष | वैशाली संजय बढे |
| 5 | सभासद | निकिता सारस देशपांडे |
| 6 | सभासद | वृषाली मयुरेश बिवरे |
| 7 | सभासद | श्रुती काळे |


### संस्थेचे जनरल बॉडी मेंबर्स

१. डॉ. मेघा क्षीरसागर २. आसावरी गोगटे ३. जान्हवी कुलकर्णी ४. दीपाली नेमाडे ५. वासंती काशीद
६. अनिता घाटणेकर ७. श्रुती जोशी ८. संध्या पन्हाळकर ९. शैलजा जोशी १०. रेश्मा अलूरकर

### आमचे प्रकाशन :




आमचा पत्ता :
ऑफिस नंबर ५, “सत्यविला” अपार्टमेंट्स
एकलव्य पॉलिटेक्निक समोर,
कोथरूड, पुणे -४११०३८.
दूरध्वनी : ८४०८८४०६१६
Website: [www.sumantra.center](http://www.sumantra.center) FB page:sumantracounselling@gmail.com

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950**

**SCHEDULE IX [Vide Rule 17(1)]**

**SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTER**

**OFFICE NO. 5, SATYA-VILLA BUILDINGS, OPP. EKLAVYA POLYTECHNIC, KOTHRUD PUNE 411038**

**BALANCE SHEET AS ON 31.03.2020**

| FUNDS & LIABILITIES | Sch. | 31.03.2020 | 31.03.2019 | PROPERTY & ASSETS | Sch. | 31.03.2020 | 31.03.2019 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TRUST FUNDS & CORPUS | D | 42,000.00 | 33,600.00 | FURNITURE FIXTURE AND OTHER ASSETS | G | 37,785.00 | 47,615.00 |
| LOANS (SECURED OR UNSECURED) | | 0.00 | 0.00 | INVESTMENTS | H | 51,115.00 | 39,928.00 |
| CURRENT LIABILITIES & PROVISIONS | E | 45,416.00 | 9,850.00 | CASH & BANK BALANCES | I | 1,08,134.80 | 54,750.60 |
| INCOME & EXPENDITURE A/C | F | 1,35,833.80 | 1,19,738.60 | OTHER CURRENT ASSETS | J | 26,215.00 | 20,895.00 |
| **TOTAL Rs.** | | **2,23,249.80** | **1,63,188.60** | **TOTAL Rs.** | | **2,23,249.80** | **1,63,188.60** |

**The above Balance Sheet to the best of my belief contains a true account of the Funds & Liabilities and of the Property and Assets of the Trust.**

**AS PER OUR REPORT OF EVEN DATE**

**PLACE: PUNE**
**DATE : 21/10/2020**
**UDIN : 20148366AAAAAY3268**

SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTRE
Reg. No. Mah. 1991/2014 Pune
Reg. No. F/45073/Pune
Kothrud, Pune

VEDVATI V. LELE
M. No. 148366
CHARTERED ACCOUNTANT

**VEDVATI V. LELE**
**CHARTERED ACCOUNTANT**

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950**
**SCHEDULE IX [Vide Rule 17(1)]**
**SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTER**
**OFFICE NO. 5, SATYA-VILLA BUILDINGS, OPP. EKLAVYA POLYTECHNIC, KOTHRUD PUNE 411038**

**INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2020**

| EXPENDITURE | Sch. | 31.03.2020 | 31.03.2019 | INCOME | Sch. | 31.03.2020 | 31.03.2019 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| To Opening Stock | | 20,895.00 | 26,600.00 | | | | |
| To Expenditure in respect of the Property | | 0.00 | 0.00 | By Rent | | 0.00 | 0.00 |
| To Establishment Expenses | B | 1,915.80 | 4,619.40 | By Interest on Fixed Deposit with Banks | | 2,787.00 | 2,181.00 |
| To Remuneration to Trustees | | 0.00 | 0.00 | By Interest on Saving Bank | | 0.00 | 0.00 |
| To Legal Expenses | | 0.00 | 0.00 | By Donation | | 2,46,302.00 | 1,59,800.00 |
| To Audit Fees | | 6,500.00 | 6,500.00 | By Income from Other Sources | A | 1,84,560.00 | 1,50,250.00 |
| To Depreciation & Assets write off | G | 9,830.00 | 9,864.00 | | | | |
| To Expenditure on Object of the Trust | C | 3,97,628.00 | 2,48,203.00 | By Closing Stock | | 19,215.00 | 20,895.00 |
| To Excess of Income over Expenditure | | 16,095.20 | 37,339.60 | | | | |
| **TOTAL** | | **4,52,864.00** | **3,33,126.00** | **TOTAL** | | **4,52,864.00** | **3,33,126.00** |

**AS PER OUR REPORT OF EVEN DATE**

**PLACE: PUNE**
**DATE : 21/10/2020**
**UDIN : 20148366AAAAAY3268**

SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTRE
Reg. No. Mah. 1991/2014 Pune
Reg. No. F/45073/Pune
Kothrud, Pune

VEDVATI V. LELE
M. No. 148366
CHARTERED ACCOUNTANT

**VEDVATI V. LELE**
**CHARTERED ACCOUNTANT**